# प्रकरण तिसरे

# मराठी पत्रकारितेचे स्वरुप

## प्रकरण - ३

# मराठी पत्रकारितेचे स्वरुप

३.१ प्रस्तावना

३.२ १९ व्या शतकाचा विचारव्यूह

३.३ आरंभीच्या वृत्तपत्रांचे स्वरुप

३.४ वृत्तपत्रांची शीर्षके

३.५ दपर्णनंतरची वृत्तपत्रे

३.६ ज्ञानोदय आणि उपदेशचंद्रिका, विचारलहरी व सद्धर्मदीपिका

३.७ मराठी वृत्तपत्रांचे नवे वळण

३.८ सामाजिक चळवळ आणि वृत्तपत्रे.

३.९ व्यंगचित्रांची कामगीरी

३.१० टिळक-आगरकरांची वृत्तपत्रे

३.११ प्रबोधन चळवळ आणि वृत्तपत्रे

३.१२ मराठी वृत्तपत्रांची वाढ

३.१३ वृत्तपत्रांच्या विकासाचे कालखंड

३.१४ मराठी वृत्तपत्रांची कोल्हाटकरी वळण

३.१५ मराठी निबंधांचा विकास

३.१६ वाचकांची पत्रे

३.१७ जाहिराती

३.१८ संस्थाने, संस्थानिक व मराठी पत्रे

३.१९ समकालीन पत्रकारीतेचे स्वरुप विशेष

## ३.१ प्रस्तावना :

एकोणिसाव्या शतकाला 'चमत्कार युग' 'Wonderful Century' असे नामाभिधान मिळाले आहे. [१] कोणत्याही नव्या युगाचा असा धर्मच आहे की, त्याचे आगमन नव्या विचारांच्या ललकाऱ्यांनी सूचित होत असते. [२] ब्रिटिश सत्तेच्या स्थापनेनंतर व पुढे नवी शिक्षण पद्धती सुरु झाल्यावर विचारमंथन सुरु झाले. त्यातून वृत्तपत्रांचा उदय झाला [३] असला तरी भारतात मुद्रणकलेचा प्रवेश सोळाव्या शतकातच झाला. तेव्हाच भारतीय वृत्तपत्रसृष्टीचे अप्रत्यक्ष बीजारोपण झाले. [४] मुद्रणकलेचा शोध लागून पुस्तके, पत्रके मोठ्या संख्येने छापली जाऊन ज्ञानप्रसाराचे मोठे सहाय्य झाले. ही गोष्ट धार्मिक आणि सामाजिक सुधारणेला फार उपकारक ठरल्याची नोंद [५] रा.भि. जोशी यांनी 'महाराष्ट्रातील प्रबोधनपर्व संपले आहे काय ?' या लेखात केली आहे. मराठी भाषेच्या दृष्टीने पाहता कलकत्त्याजवळ सेरामपूर येथे आणि खुद्द तंजावरात राजे सर्फोजी भोसले यांच्या राजवाड्यात मराठी भाषेत पुस्तके छापण्यासाठी स्वतंत्र छापखाने निघाले होते. वरील दोन्ही मुद्रणालयात पहिले मराठी ग्रंथ मोडी लिपीत प्रथम छापण्यात आले आहेत. [६]

इंग्रज भारतात आले तेच मुळी आपली भाषा, धर्म, संस्कृती, नवविचार आणि नवे ज्ञानविज्ञान घेऊनच. पारंपरिक जीवनपद्धतीवर नव्या व्यापाऱ्यांचे: नव्या शासनकर्त्यांचे आघात झाले. प्रचार-प्रसाराच्या नवीन माध्यमांचे आगमन झाले. हिंदुस्थानात मुद्रणमंदिराची स्थापना करण्याचे आणि ग्रंथाचा व वृत्तपत्रांचा आरंभ करण्याचे श्रेय कलकत्याच्या जवळ असलेल्या श्रीरामपूरच्या 'डॉ. कॅरे' या ख्रिश्चन मिशनरीकडे जाते. [७] वृत्तपत्र या अर्थाचे मूळचे इंग्रजी शब्द 'कोरंट' व 'गॅझेट' हे होत. 'कोरंट' म्हणजे संकलित वर्तमान किंवा वृत्त. त्याही पूर्वीचा शब्द गॅझेट हा असून तो गॅझेटी (गझा) या इटालियन शब्दापासून बनला आहे. [८] अठराव्या शतकापर्यंत एडिटर हा शब्दप्रयोग प्रचारात नव्हता. बातमीविक्या हाच मालक, हाच मुद्रक व

हाच संपादक असे. तो प्रतिष्ठित शब्दा १७०९ साली सुप्रसिध्द् ग्रंथकार ॲडिसन याने टॅटलर पत्राच्या संबंधात, त्याचा सुप्रसिध्द् मित्र व समव्यवसायी जो स्टील, त्याला प्रथम लावून उपयोगात आणला.

लोकसंवादाचे व प्रबोधनाचे 'वृत्तपत्र' हे एक आधुनिक प्रभावी माध्यम आहे. [९] लोकमताला वाचा फोडण्याकरिताच वृत्तपत्राचा जन्म आहे. [१०] असे न.चिं. केळकर यांनी आपल्या संपादकीय अनुभवाचे सार सांगितले आहे. ते म्हणतात, "जनतेच्या हाती जर खरे शस्त्र म्हणून कोणते यशस्वी झाले असेल तर ते छापखाने व वर्तमानपत्रे हेच होय."[११] भारतातील विविध राज्यांत प्रजा स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रारंभ झाला. या चळवळींना मदत छापखाने व वर्तमानपत्र यांचीच झाल्याचे हिंदी वर्तमानपत्रांच्या इतिहासाचा मागोवा घेताना न.चिं. केळकरांनी म्हटले आहे. त्याचप्रमाणे राजकीय चळवळ जी आज इतक्या सुस्थितीला आली आहे, तिचे पुष्कळसे श्रेय छापखाने व वर्तमानपत्रांना द्यावे लागेल. [१२] असेही प्रतिपादन त्यांनी केले आहे. गंगाधर पानतावणे वृत्तपत्रांना 'ज्ञानशस्त्र'[१३] म्हणतात. समाजाच्या विकासाबरोबर जीवन आणि ज्ञान या विषयीच्या जिज्ञासा आणि कल्पना विस्तृत होतात. तेव्हा कला, इतिहास, धर्म, वाड्मय, समाज, संस्कृती या विषयीचे ज्ञान जाणून घेण्यासाठी 'वृत्तपत्र' हे महत्वाचे साधन ठरते. लोकशिक्षण आणि लोकसेवा ही वृत्तपत्रांची मूलभूत प्रेरणा असल्याने समाजधारणेचे महान कार्यही त्यामुळे होते, असा व्यापक पट या साधनाचा पानतावणे यांनी मानला आहे. ब्रिटिश अंमलाच्या मन्वंतराने हिंदी वृत्तपत्र व्यवसायास जन्म दिला. मराठी वृत्तपत्र व्यवसायही याला अपवाद नव्हता. [१४] असे वृत्तपत्रांच्या इतिहासावरुन दिसून येते.

## ३.२ १९ व्या शतकाचा विचारव्यूह :

१९ वे शतक प्रबोधनाचे शतक होते, ब्रिटिश सत्ता हिंदुस्थानात स्थापन होऊन नव्या राज्यव्यवस्थेला आरंभ झाला होता. आपण 'प्रबोधन' हा शब्द युरोपमध्ये झालेल्या 'रेनेसान्स'

चा प्रतिशब्द म्हणून वापरला जातो. पुढे अठराव्या शतकात आलेल्या 'एन्लायनमेन्ट' शब्दाचा प्रतिशब्द म्हणूनही त्याचा वापर केला जातो. 'रेनेसान्स' मध्ये पुनरुज्जीवनावर अधिक भर होता. तर 'एन्लायनमेन्ट' मध्ये नव्या विज्ञानाने दिलेल्या एका विशिष्ट जीवनदृष्टीवर अधिक भर होता. पण प्रबोधनात सर्वांगीण परिवर्तनाचा वेध अधिक आहे. [१५] 'आपल्या प्रबोधनाच्या वाटा आणि वळणे' यांची दिशा प्रभाकर पाध्यांनी वरीलप्रमाणे स्पष्ट केली आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात हिंदुस्थानात मोठ्या प्रमाणात घडामोडी झाल्या ; तरी त्याची सुरुवात १८१८ पासून वेगाने झाली होती. १९ व्या शतकात हिंदुस्थानात (त्यात महाराष्ट्र आलाच) साहित्याचा सामाजिक प्रभव जोमदारपणे जाणवू लागला. मुद्रण तंत्राचा प्रभाव हा घटक त्याला कारणीभूत ठरला, पण पुस्तकांची वाढली उपलब्धता हे एकमेव कारा मानणे चुकीचे ठरले. डॉ. राजा दीक्षित म्हणतात, 'मध्ययुगीन भारतात सामान्यपणे समूहासमोर कलाविष्कार सादर केले जात असत. लोकांपर्यंत साहित्य पोहचत असे ते श्रवणाद्वारे. परंतु एकोविणसाव्या शतकात साहित्याला खासगी स्वरुप प्राप्त झाले. छापील रुपातले साहित्य व्यक्तीने एकट्याने वाचण्याची प्रक्रिया वाढत्या प्रमाणात सुरु झाली. त्यामुळे वाचक आणि लेखक यांच्या संवादाला वेगळे परिणाम प्राप्त झाले.. श्रोता या भूमिकेपेक्षा 'वाचक' ही भूमिका व्यक्तीला अधिक अंतर्मुख करणारी होती. [१६] विश्वविद्यालयातून वाघिणीचे दूध पिऊन पहिली पिढी बाहेर पडली होती. नव्या वाचकवर्गाचा उदय, साहित्यातील वाढता ऐहिक आशय, भाषांतराला आलेले महत्व, वृत्तपत्रीय वाङ्मयाचा विकास, निबंध या वाङ्मय प्रकाराचा वाढता उपयोग, विनोद व उपहासाचा वाढता वापर, काव्याच्या आशय व घाटामध्ये घडत गेलेले बदल.. अशा विविध घटकांमधून साहित्यक्षेत्रातील परिवर्तनाची तसेच समाजविचार व समाजबदलाशी असणाऱ्या त्याच्या नात्याची कल्पना [१७] राजा दीक्षितांनी आपल्या प्रबंधात मांडली आहे. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासूनच कादंबऱ्या, आत्मचरित्रे, नाटके, काव्य, महाकाव्ये, संस्कृत काव्यांची,

नाटकांची भाषांतरे प्रसिध्द होऊ लागली. सनातनी आणि सुधारक यांचे प्रखर वाद होऊ लागले. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी राजकीय, सामाजिक वादांची वादळे झाली. [१८] ब्रिटिश सत्ता प्रथम बंगालात स्थापन झाली. नव्या पर्वाची ओळख बंगालात अधिक झाली. ब्रिटिश सत्ता हिंदुस्थानात स्थापन झाल्यानंतर जे मन्वंतर घडून आले त्या मन्वंतराची खरी ओळख प्रथम राजा राममोहन रॉय यांना झाली. नव्या राजवटीबरोबर आलेल्या नवीन गोष्टी आत्मसात केल्या तरच जीर्ण झालेल्या हिंदी संस्कृतीला नवजीवन येईल, नाहीतर तरणोपाय नाही. पाश्चात्य संस्कृतीशी तुलना करता हिंदी संस्कृती मरणोन्मुख झालेली त्यांना आढळली.[१९] राजा राममोहन रॉय लोकशिक्षणाच्या आकांक्षेने लोकमत संघटित करण्याच्या जरुरीत वृत्तपत्रांकडे वळले. आपली वृत्तपत्रे चालविताना त्यांनी आपली विशुध्द भूमिका कायम राखली. [२०] नव्या युगाच्या आवाहनाला जोमदार प्रतिसाद बंगालीपाठोपाठ मराठीनेच प्रथम दिला. [२१] तरी मराठीचा वेगळा बाणाही दिसून आला. मराठी वृत्तपत्रांची सुरुवात मुंबईमध्ये झाली. ही गोष्ट मुद्दाम उल्लेखनीय वाटते. किंबहुना अव्वल इंग्रजीतील बहुतेक सामाजिक चळवळी मुंबईमध्येच सुरु झाल्या व नंतरच महाराष्ट्राच्या केंद्रस्थानी म्हणजे पुण्यात सुरु झालेल्या आढळतात; परंतु पुण्यात सुरु झालेल्या चळवळीचे स्वरुप निराळे असे. पुण्यातील चळवळींना स्वसंस्कृतीचे अधिष्ठान असे. [२२] पुणे ही पेशव्यांची राजधानी होती. यामुळे जुन्या कल्पनांचा तेथे पगडा होता. भिक्षुकी, कारकुनी, शेतकी, सावकारी, शिलेदारी आणि सरदारी पेशाचे असे ते निलाखस शहर होते. पेशव्यांच्या राजधानीमुळे पुणे जुन्या संस्कृतीचे भारतातील एक प्रमुख ठिकाण बनले होते. मुंबईच्या बहुभाषिक, बहुधार्मिक व व्यापारी केंद्रामुळे तिने नवसंस्कृतीचा स्वीकार केला असावा. व्यापारी शहरातील लोक नविन गोष्टींचा स्वीकार करायला लवकर तयार होतात. शिवाय व्यापाऱ्याच्या मालाबरोबर विचार-आचाराची देवाणघेवाणही नकळत होते. यामुळे जुन्या गोष्टी टाळून देण्याला शेतीप्रधान समाजाकडून जेवढा विरोध होतो, तेवढा व्यापारी समाजाकडून होत नाही. महाराष्ट्रात स्वराज्य होते. आमचेच राज्य इंग्रजांनी नष्ट केले, ही बोच,

पेशवाई कितीही तिरस्करणीय वाटत असली तरी, अधिक प्रभावी होती. यामुळे इंग्रजी गोष्टीविषयी आपुलकी निर्माण होण्यापेक्षा तिरस्कारच उत्पन्न होण्याचा अधिक संभव होता. शिवाय नवीन व्यापारी संस्कृतीचे स्वरुप ध्यानी घेण्यालाही शेतीप्रधान महाराष्ट्राची कुवत नव्हती. यामुळे नवीन गोष्टी उचलण्यास इतर महाराष्ट्र मुंबईनंतरच तयार झाला. पुढे पाश्चात्य संस्कृतीचा स्वीकार करतानाही संस्कृतीच्या अभिमानाला मूठमाती देण्यात आली नाही.[२३]

कसब्यातील राहणारांपैकी बहुतेकांचा धंदा शेतकी करण्याचा होता. ब्राह्मण मात्र उपाध्येपण, भिक्षुकी आणि सावकारी करुन आपला उदरनिर्वाह करीत असत. दुसरे लोकांनी शेतात मरेतो काम करुन सरकार व सावकार यांची भरती करावी आणि जे उरेल ते आपल्या कुटुंबपोषणार्थ ठेवावे. ते संपले म्हणजे पुन्हा सावकारापासून 'गुरें ढोरें, बायकां पोरें, शेतीं, पोतीं, गाडगीं, मडकीं' सर्व गहाण लावून देऊन दिढी दुपटीचे व्याजाने पैसे अथवा दाणे घ्यावे, त्या लोकांचा सावकार म्हणजे प्रत्यक्ष मूर्तिमंत यमराजच. [२४] त्यावेळचे सावकार कुळापासून बायका, मुली गहाण लावून घेत असत.

## ३.३ आरंभीच्या वृत्तपत्रांचे स्वरुप :

मराठी वृत्तपत्र व्यवसायाचा प्रारंभ प्रथम मुंबईत झाला. ब्रिटिश राजवटीच्या प्रारंभानंतर दोन दशकाच्या आतच मराठी पत्रसृष्टीला प्रारंभ झाला. लोकांच्या प्रबोधनाचा उद्देश मनाशी धरु सुरु झालेली वृत्तपत्रे लोकशिक्षण करताना समाजातील दोषाप्रमाणेच शासनाच्या चुकांवर प्रहार करणार हे अपेक्षितच होते. [२५] इंग्रजी सत्ता हळूहळू हिंदुस्थानात दृढ होण्याचा हा काल असल्यामुळे त्या संबंधात आपले मत व्यक्त करण्याकरिता जनतेला आणि पुढाऱ्यांना वर्तमानपत्र हे चांगले साधन सापडले. [२६] या साधनाचा समाजधुरिणांनी लोकचळवळीचे आणि लोकसंवादाचे शस्त्र म्हणूनही पुढे उपयोग करुन घेतला. पेशवाई जाऊन इंग्रजी राज्य स्थिरावल्यावर नव्या राज्यकर्त्यांनी जी लोकशिक्षणाची पद्धत सुरु केली तिच्या योगाने

महाराष्ट्रात वृत्तपत्रे अवतरावी हे क्रमप्राप्तच होते. मात्र त्याचे ध्येय हे केवळ बातम्या सांगणे एवढेच नव्हते. लोकांना उपयुक्त अशा ज्ञानाचा प्रसार करण्याच्या कामगिरीला वृत्तपत्रांच्या ध्येयात महत्वाचे स्थान होते. [२७] देशी लोकांनी वृत्तपत्र व्यवसायाला हात घातला तो विचारप्रसाराचे साधन म्हणून समाजातील दोषांची जाणीव झाली व ते नष्ट करण्याची आवश्यकता पटली. वैचारिक जागृतीमुळे समाजात वृत्तपत्राांची आवश्यकता निर्माण झाली. वृत्तपत्रांचा उदय समाजातील नवशिक्षितांनी अनेक सामाजिक चळवळी उभारल्या त्यातून झाला. [२८] मराठीतील पहिले पत्र म्हणून 'मुंबापूर वर्तमान' हे पत्र २० जुलै १८२८ ला सुरु झाल्याचा उल्लेख करावा लागतो. पण पत्राचा संपादक कोण ? पत्र किती काळ चालले ? ते साप्ताहिक होते का पाक्षिक ? याचा तपास लागत नसल्याने १८३२ मध्ये सुरु झालेल्या बाळशास्त्री जांभेकरांच्या 'दर्पण' ला पहिल्या पत्राचा मान द्यावा लागतो. "लोकस्थिती, धर्म, रीती आणि उपयोगी फेरफार घडवून आणणे" हे नियतकालिकाचे कर्तव्य आहे, अशी त्यांची धारणा होती. [२९] ज्ञानप्रबोधनासाठी दर्पण अस्तित्वात आला होता. लोकहितवादी (सरदार गोपाळ हरी देशमुख) यांनी लोकांची 'बृहत्तर जिव्हा' असा जो वृत्तपत्रांचा गौरव केला होता, त्याला पात्र ठरावे असे दर्पण पत्र होते. [३०] दर्पण पत्र साप्ताहिक होते. आज 'वृत्तपत्र' या संज्ञेचा अर्थ दररोज सकाळी घरी येणारे, ठळक हेडलाईन व डेडलाईन असलेले छापील, विविध पुरवण्या असणारे आणि काही वृत्तपत्रउद्योगातील कंपन्यांनी साखळी स्वरुपात काढलेले दैनिक पत्र म्हणजे वृत्तपत्र असा घेतला जातो. दर्पणपासून तर केसरी-सुधारकांपर्यंत आणि विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात प्रसिद्ध होऊ लागलेल्या भास्कर बळवंत भोपटकरांच्या 'भाला' पत्रापर्यंत वृत्तपत्रे या संज्ञेत साप्ताहिक पत्रांचाच विचार करावा लागतो. त्यावेळची सर्व वृत्तपत्रे साप्ताहिकच होती. [३१] तसेच ती फक्त वृत्त देण्याचे काम करीत नव्हती. ती सर्व मतपत्रे होती. टिळकांच्या हयातीत केसरी द्विसाप्ताहिक झाला. केसरीला दैनिकात रुपांतरीत करण्यास टिळक

तयार नव्हते. टिळकांनंतरच्या केसरी दैनिकरुपात निघू लागला. लोकांना सज्ञान करावे, त्यांना त्यांच्या राजकीय, सामाजिक हक्कांची जाणीव करुन द्यावी ; राजकर्त्यांच्या कानावर लोकांची गाऱ्हाणी घालावी, असा पहिल्या वृत्तपत्रांचा त्रिविध उद्देश स्पष्ट दिसतो. लोकांना परिस्थितीचे ज्ञान देऊन विशिष्ट प्रगतिकारक मतांचा प्रसार अवतार होता. [३२]

दर्पण पत्र निघाले तेव्हा हिंदू समाजाला मराठी वृत्तपत्रांचा परिचय झालेला नव्हता. मराठी वृत्तपत्र निघालेले नव्हते. धार्मिक व राजकी बाबतीत उदार विचार प्रसृत करुन देशबांधवांची सुधारणा करण्याचा व वृत्तपत्राविषयी आवड निर्माण करण्याच्या हेतूने हे पत्र काढण्यात आले होते, असेही म्हटले होते. [३३] मराठी वृत्तपत्राच्या प्रारंभीच्या काळातच विधायक वृत्तीचा बाणेदार संपादक लाभला. त्यानंतर चढत्या श्रेणीने वृत्तपत्रात संपादकीय परंपरा निर्माण झाली. वृत्तपत्राचा चालक हाच संपादक असे. वृत्तपत्राच्या स्वातंत्र्यासाठी वृत्तपत्रकारांनी, संपादकांनी लढे दिले. प्रसंगविशेषी तुरुंगवासही पत्करला आहे.

सुरुवातीची सारी वृत्तपत्रे इंग्रजी होती व त्याचे स्वरुप आंग्ल समाजासाठी चालविलेली वृत्तपत्रे असे होते. पुढे अँग्लो-इंडियन वृत्तपत्रे म्हणून जी ओळखली जाऊ लागली, त्यापेक्षा या वृत्तपत्रांचा वाचकवर्ग अधिक मर्यादित होता. हिंदुस्थानात चालविण्यात येत होती म्हणून त्यांना भारतीय म्हणायचे, अन्यथा ती इंग्लंड मधील वृत्तपत्रांची कमी दर्जाची नक्कल होती. हिंदी जनतेबाबत, येथील घडामोडींबाबत त्यात विशेष काही आढळत नसे. यामुळे हिंदी जनतेच्या आकांक्षांचे प्रतिबिंब त्यात पडण्याचा प्रश्नच नव्हता. असे असले तरी भारतीय वृत्तपत्रसृष्टीचा पाया त्यांच्याद्वारा घातला गेला. शिवाय या वृत्तपत्रांनी हिंदी वृत्तपत्रांसाठी एक तयार नमुना उपलब्ध करुन दिला. तसेच हिंदुस्थानात वृत्तपत्र जन्माला आले तेच मुळी राज्यकर्त्यांबाबत व त्यांच्या कारभाराबाबत असंतोष निर्माण झाल्यामुळे. साजहिकच ही वृत्तपत्रे सरकारी कारभारातील दोष, तसेच उच्चपदस्थांचा भ्रष्टाचार यावर बेडरपणे टीका करीत. अर्थात

व्यक्तिगत निंदा, कुलगंडी यांनीही ही वृत्तपत्रे दूषित झालेली होती. इंग्रजी वृत्तपत्रांचा हा तयार नमुना पुढील वृत्तपत्रांना आणि हिंदी लोकांना मार्गदर्शक ठरला. [३४]

मराठी वृत्तपत्रव्यवसाय धंद्याच्या हेतूने उदयास आला नाही, तर ध्येयवादाच्या तळमळीतून साकार झाला. वृत्तपत्रव्यवसाय धंदा नाही, धर्म आहे याच वृत्तीने वृत्तपत्रे जन्माला आली. अज्ञानाच्या, परंपरागत रुढींच्या, धर्मातील अनिष्ट चालींच्या इत्यादि विविध अंधःकारात सापडलेल्या आपल्या देशबांधवांना ज्ञानाचा प्रकाश दाखवण्याच्या हेतूने वृत्तपत्रांचा उद्भव झाला. त्यासाठी पाश्चात्य ज्ञानाच्या प्रसाराची आवश्यकता होती. ज्ञानप्रसारासाठी या सुरुवातीच्या नवशिक्षितांनी जे उपक्रम आरंभिले, त्यापैकीच वृत्तपत्राचा उपक्रम होय. [३५] बाळशास्त्री जांभेकर, 'प्रभाकर' कर्ते भाऊ महाजन, इंदुप्रकाशचे विष्णुशास्त्री पंडित, नेटीव ओपिनियनचे रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक, मामा परमानंद, न्या. महादेव गोविंद रानडे, रामकृष्ण गोपाळ भांडारकर हे नवशिक्षितांच्या पिढीनेच प्रतिनिधी वृत्तपत्रव्यवसायाचे भरणपोषण करण्यासाठी पुढे आले.

मराठीतील आरंभीची वृत्तपत्रे इंग्रजी, मराठी असा मजकूर देत. दर्पणचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रसिद्ध झाला. "या देशाचे लोकांत विलायती विद्यांचा अभ्यास वाढावा. तेथील ज्ञान प्रसिद्ध व्हावे, असे नात्याने या वर्तमानपत्राचा उद्योग मुख्यत्वे आरंभिला आहे खरा; परंतु ज्यास इंग्रजी भाषा येते त्यास मात्र याचा उपयोग असे न व्हावे म्हणून योजिले आहे की, एका बाजूस इंग्रजी व एका बाजूस मराठी असावे, म्हणजे जे मराठी मात्र जाणतात, त्या सर्वासही याचा उपयोग होईल. मूळ विषय आणि भाषांतर समोरासमोर छापली जातील."[३६] असे पहिल्याच अंकात बाळशास्त्री जांभेकरांनी स्पष्ट करुन इंग्रजी मराठीच्या 'गंगाजमनी'[३७] थाटाने दर्पण व त्यानंतरची काही वृत्तपत्रे चालली. बहुजन समाजाला ज्ञानाच्या अंगाने आवश्यक असणाऱ्या विषयांचा खल मराठीत करावयाचा आणि राज्यकर्त्यांच्या कानावर जे विषय जावे

अशी इच्छा असेल त्यांच्याकरिता इंग्रजीत मजकूर छापावयाचा असा वृत्तपत्रांचा प्रघात होता.[३८] ज्ञानप्रकाशच्या ता. १९ मार्च १८४९ च्या कागदात वर्तमानपत्रांना सरकारवर टीका करण्याचा अधिकार आहे असे प्रतिपादन केले होते, "जो सरकारचे चाकर करतो त्याचे वर्तणुकीविषयी छापणारे यांनी जे संभवेल ते लिहिण्याचा अधिकार आहे, कारण जो सरकारचा नोकर तो लोकांचा चाकर आणि छापणारे लोकांचे डोळे आहेत" असे मत मांडून 'छापखाने सुधारणेचे द्वार आहे' असा विश्वास प्रगट केला आहे. [३९]

## ३.४ वृत्तपत्रांची शीर्षके :

मराठी वृत्तपत्रांची शीर्षके त्यांचे स्वरुप, ध्येय-उद्दिष्ट स्पष्ट करायला मदत करतात. वृत्तपत्र व्यवसाय बंगालपाठोपाठ मराठीत अवतरला. बंगालमध्ये 'दर्पण' अवतरले तर त्यांचे भावंड महाराष्ट्रात ज्ञान आणि वृत्त या दोहोंचे काम करु लागले. बंगालमध्ये 'सोमप्रकाश' जन्म पावला; तर महाराष्ट्रात 'इंदुप्रकाश' त्याचे स्मरण देऊ लागला. ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश, सूर्योदय, अरुणोदय, प्रभाकर, धूमकेतु या सर्व नावांचा प्रकाश पुरवण्याच्या क्रियेशी संबंध आहे. लोकांना शिकवून शहाणे करण्याचा बाणा असल्यामुळे त्याचा बोध होईल अशी नावे त्यांच्या वाटणीस झाली. वृत्तपत्रांच्या कर्तव्यात लोकांचे दोष चव्हाट्यावर मांडण्याचे कर्तव्य आहे व त्याचा संकेत दर्पण या नावांनी गळी उतरतो,[४०] ही पत्रे मात्र आंग्लविद्याविभूषित मध्यमवर्गीय धुरीणांची होती. बहुसंख्य वृत्तपत्रकार हे ब्राह्मण हाते. म. जोतीराव फुल्यांनी जे दोनच अंक प्रसिद्ध केले ते 'सत्सार' या शीर्षकाने हे शीर्षक योजताना फुले सत्यशोधक समाज, सत्यसमाज यातील 'सत्' हे पद उचलून आपल्या पत्राचे शीर्षक योजतात. कृष्णराव भालेकरांचे पत्र 'दीनबंधु' नावाने दीनांच्या कैवाराचे ध्येय सांगते. जागरुक, जागृती, विजयी मराठा, तेज, दीनमित्र, राष्ट्रवीर, हंटर या पत्रांच्या शीर्षकांनी वीरवृत्ती, जागृती, बंधुत्व-मित्रत्व, शस्त्राची पूजा असे

बहुजनकेंद्री भाव व्यक्त होतात. हे सत्यशोधक, ब्राह्मणेत्तर वृत्तपत्रांचे वैशिष्ट्य होते. तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या वृत्तपत्रांना मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुध्द भारत अशी शीर्षकं देऊन दलित, शोषित, पीडित वर्गाची पण प्रबुध्द भारतापर्यंत विकसित होत जाणारी शीर्षके योजली आहेत. ब्राह्मणेत्तर वृत्तपत्रांची आणि दलित वृत्तपत्रांची शीर्षके वेगवेगळी ध्येयं, उद्दिष्टे आणि विचारधारा स्पष्ट करणारी आहेत. पुढील प्रकरणात ब्राह्मणेत्तर पत्रकारितेचा विचार अभ्यासक करणार आहे.

## ३.५ दर्पणनंतरची वृत्तपत्रे :

बाळशास्त्री जांभेकरांनी ‘दर्पण’. पत्र सुरु केले व मराठी वृत्तपत्र व्यवसायाचा पाया घातला. परंतु दर्पण पत्रात इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषेत मजकूर येई. शिवाय ७/८ वर्षात हे पत्र बंद पडले. यानंतर निघालेले ‘मुंबई अखबार’ हे शंभरटक्के मराठी वृत्तपत्र होते. परंतु हेही पत्र फार दिवस टिकले नाही. शिवाय दर्पणच्या मानाने ‘अखबाराचा’ दर्जा जरा कमीच होता. मुंबई अखबारच्या नंतर सुरु झालेले ‘प्रभाकर’ हे शंभरटक्के मराठी पत्र होते व हे पत्र सुमारे २५ वर्षे एवढ्या दीर्घ कालावधीपर्यंत टिकले. शिवाय प्रभाकरात येणार मजकूर हा विविध व विचारप्रवर्तक असे. यादृष्टीने मराठी वृत्तपत्रांच्या इतिहासात ‘प्रभाकराचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. मराठी वृत्तपत्रांचा पाया दर्पणकडून घातला गेला; तर पाया भक्कम करण्याची कामगिरी ‘प्रभाकराने’ च बजावली.’[४१] सुप्रसिद्ध ‘लोकहितवादी’ यांची ‘शतपत्रे’ प्रथम प्रभाकरातच प्रसिद्ध झाली. शतपत्रातील मार्मिक व मूलग्राही विवेचन आजही उद्‌बोधक वाटते. इंग्रजी राजवटीवर टीका ‘प्रभाकरातच’ प्रथम सुरु झाली.[४२] मात्र पुण्यात शतपत्रांविषयी चांगले मत नसावे असे ‘ज्ञानप्रकाश’ मधील उताऱ्यावरुन दिसते आणि लोकसुधारणेची रीती लोकहितवादी मनात आणतात ते नव्हे. जर बोध करावयाचा असल्यास चांगले युक्तीने व मृदू

भाषणाने व ईश्वरास नजर ठेवून बोलले पाहिजे. यापैकी एकही गुण त्यांचे लिहिण्यावरुन आम्हास दिसत नाही. त्याजवरुन लोकहितवादीस गर्व व विचार किती आहे हे सहज ध्यानात येईल. [४३] असे 'वृत्तपत्रांचा इतिहास'. वाचताना स्पष्ट होते. पुणे ते पेशवाई संस्कृतीचे केंद्र असल्याने पुण्याचे मत हे पुराणमतवादी व परंपरावादी केंद्राकडे जाणारेच असे. त्यातूनच १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात पुण्यात सुधारक-दुर्धारकांमध्ये लेखणीच्या सहाय्यानेच रण माजले. शतपत्रांचे महत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखले आणि ती 'बहिष्कृत भारतातून' पुन्हा प्रसिद्ध केली.

मुंबईस मराठी पत्र निघून बारा वर्षाचा काळ लोटल्यानंतरच पुण्यात ज्ञानसिंधुकार विरेश्वर सदाशिव छत्रे यांनी 'मित्रोदय' पत्र सुरु केले. पुण्याचे पहिले पत्र म्हणून 'मित्रोदय' ची नोंद घ्यावी लागते. पुढे १८४९ साली 'ज्ञानप्रकाश' निघाला. 'ज्ञानप्रकाश' पत्र सुरु करण्याची गरज ज्या मंडळींना वाटली ती पुण्याचीच. त्यांनी आपणहून पत्र काढले. हे स्थानिक जागृतीचे लक्षण होते. पुण्यात 'ज्ञानप्रकाशने वृत्तपत्राची उणीव भरुन काढली. राज्यकारभार व लाकांना प्रिय होणारे नवे विचार या दोन्ही गोष्टींचा कसल्याही अभिनिवेषास बळी न पडता समतोलपणाने परामर्श घेणारे हे वृत्तपत्र असल्यामुळे त्यामुळे लोकात लवकरच प्रेम दिसू लागले' [४४]. १८६२ पर्यंत 'ज्ञानप्रकाश' शिळा छापावर छापण्यात येत असे. १८६३ पासून तो टाईपावर निघू लागला. १८५३ पासून 'ज्ञानप्रकाश' द्विसाप्ताहिक झाल्यावर 'वाङ्मय, राजकारण, व्यापार व वार्ता यांना वाहिलेले द्विसाप्ताहिक' असे पत्राच्या नावाखाली छापण्यात येत असे. १८७० ला न्या. महादेव गोविंद रानडे पुण्यात आले. १८९० पर्यंत रानडे पुण्यात होते. या काळात 'ज्ञानप्रकाश' प्रामुख्याने त्यांच्या विचाराचा वाहक बनला. नवीन सुशिक्षित समाजात उद्‌भवलेल्या सुधारणांचा पाठपुरावा 'ज्ञानप्रकाशात' सुरुवातीपासूनच होई.

राजकारणाला महत्व आले, तरी ज्ञानप्रकाश नेमस्त पुढाऱ्यांच्याच होती होता. राजकारणाच्या रणधुमाळीत ज्ञानप्रकाशने आपली वृत्तपत्रीय नितिमत्ता कधीही सोडली नाही. एकेकाळी समाजसुधारणेचा विचार जहाल विचारवंतांना मान्य नसताना या पत्राने त्या विचारांचा जोराने पुरस्कार केला. राजकारणात जरी त्याने नेमस्त विचार मांडले. तरी समाजकारणात पुरोगामी विचारांची ज्योत त्याने सतत तेवत ठेवली. [४५] ज्ञानप्रकाशला १०३ वर्षांचे आयुष्य लाभले.

### ३.६ ज्ञानोदय आणि उपदेशचंद्रिका, विचारलहरी व सद्धर्मदीपिका :

१८४२ ला विरेश्वर सदाशिव छत्रे यांनी 'ज्ञानसिंधू' पत्राची सुरुवात केली. त्याचवर्षी चार महिन्याचे अंतराने 'ज्ञानोदय' हे ख्रिस्ती धर्मप्रसारासाठी निघाले. कालानुक्रमे 'ज्ञानप्रकाश' च्या आधी 'ज्ञानोदय' निघाले. या पत्राचे स्वरुप आणि दृष्टी दर्पण, प्रभाकर, ज्ञानप्रकाश यांच्यापेक्षा वेगळी होती. बाळशास्त्री जांभेकर आणि भाऊ महाजन यांनी ज्ञानप्रसारासाठी वृत्तपत्रे काढली. पण पाश्चात्यांच्या पुढाकाराने धर्मप्रसाराचे साधन म्हणून 'ज्ञानोदय' चा उदय झाला. मुंबई माध्यमाचे केंद्र असताना पुण्याच्या आधी अहमदनगर येथून हे वृत्तपत्र निघाले हे या पत्राचे वैशिष्ट्य सांगता येते. ज्ञानोदयाच्या वृत्तपत्रीय कामगिरीची प्रतिक्रिया म्हणून हिंदू धर्मावरील हल्ल्याचा प्रतिकार करणारी 'उपदेशचंद्रिका' (१८४४), 'प्रबोध चंद्रोदय' (१८५१), 'विचारलहरी' (१८५२), 'वर्तमानदीपिका' (१८५३), 'सद्धर्मदीपिका' (१८५५), 'नित्यसारसंग्रह' (पूर्वीचे नाव ज्ञानसागर - १८५५), 'दंभसहारक' (१८७१-मासिक) अशी पत्रे निघाली. ख्रिस्ती धर्मप्रसार व त्याची प्रतिक्रिया म्हणून हिंदू धर्माच्या बाजूने संरक्षणात्मक प्रयत्न अशा या पत्रांच्या प्रेरणा होत्या.

'ज्ञानोदय' पत्र अहमदनगरच्या अमेरिकन मराठी मिशनच्या लोकांनी प्रथम मासिक म्हणून १८४२ साली सुरु केले. पहिले सहा अंक केवळ मराठीत निघाले. पुढे १८६६ पर्यंत

इंग्रजी, मराठी लेख त्यात असत. शाहुराव कुकडे संपादक असताना त्यांनी केवळ मराठीतच 'ज्ञानोदय' काढला. नंतर तो पुन्हा इंग्रजी, मराठी असा संमिश्र स्वरुपात निघू लागला. 'रेव्ह, हेन्री बॅलंटाईन' हे ज्ञानोदयाचे पहिले संपादक होते. सुरुवातीला मासिक स्वरुपात प्रसिद्ध होणारे हे पत्र १८४५ पासून पाक्षिक व १८७३ पासून साप्ताहिक असे बदल ज्ञानोदयात झाले. अहमदनगर नंतर मुंबईतून 'ज्ञानोदय' प्रसिद्ध होऊ लागला. पुन्हा अहमदनगर नंतर पुन्हा मुंबईत, अशी स्थलांतरे या दीर्घायुषी पत्राने पाहिली. महाराष्ट्रातील सामाजिक व धार्मिक सुधारणेच्या वादातील एक बलवान प्रतिपक्षी व टीकाकार म्हणून एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात 'ज्ञानोदय' ला महत्व असून, महाराष्ट्राच्या तत्कालीन सांस्कृतिक इतिहासाचे ज्ञान करुन घेण्यास त्याचा चांगला उपयोग होतो. [४६] सामाजिक घडामोडींची व चळवळींची माहिती 'ज्ञानोदय' देत असे. दि. १ जाने. १८५६ च्या अंकात त्याच्या स्वरुपाविषयी म्हटले आहे,

"लोकांस खरे ज्ञान दाखवावे, खरे काय आणि खोटे काय याचा शोध कसा करावा, हे लोकांस शिकवावे आणि विशेष करुन ख्रिस्ती धर्मांची प्रमाणे पुढे आणावी आणि लोकांचे लक्ष त्याजकडे लागू करुन त्या धर्माप्रमाणे चालल्याने किती कल्याण होईल हे दाखवावे"[४७]

अहमदनगर हे ज्ञानोदयाचे दीर्घकाळ प्रकाशनस्थळ राहिले. अहमदनगर जिल्ह्यातील दलित समाज फार मोठ्या संख्येने ख्रिस्ती धर्माकडे ओढला गेला होता. हिंदू धर्मावरील टीका ज्ञानोदयात येत असे. हिंदू धर्मावरील मिशनऱ्यांच्या चढाईला प्रतिबंध करण्यासाठी सन १८४४ मध्ये वेदशास्त्रसंपन्न मोरभट दांडेकर यांनी 'उपदेशचंद्रिका' मासिक सुरु केले होते. जुन्या शास्त्री - पंडितांप्रमाणे इंग्रजी शिक्षणाचा लाभ मिळालेल्या नवशिक्षितांतूनही मिशनऱ्यांच्या प्रचाराला आवर घालण्याच्या हेतूने काही लोक पुढे सरसावले. त्यात एक आद्य मराठी ग्रंथकार कृष्णशास्त्री चिपळूणकर हे होते. हिंदू धर्मावरील हल्ल्याने तेही अस्वस्थ झाले. पुण्यातील

विद्वानांनी त्यांच्या संपादकत्वाखाली 'विचारलहरी' चा पहिला अंक आषाढ शुद्ध पौर्णिमा शके १७७४ रोजी गुरुवाती प्रसिद्ध झाला. पत्राचा 'हेतू' पुढीलप्रमाणे पहिल्या अंकात स्पष्ट केला होता -

"सांप्रत काळी स्वार्थी हेतूने हिंदू धर्माचे मिथ्या वर्णन करणारी अनेक प्रकारची पुस्तके व शाळा स्वभाषेत व स्वदेशात उत्पन्न होऊन हिंदू धर्मास ग्लानी आणण्याकरिता इंग्लिश लोक भगीरथ प्रयत्न करीत आहेत व पदरचा पैसा खर्च करुन या कामावर मिशनरी म्हणजे क्रिस्त धर्म सांगणार मनुष्य नेमतात, त्याजकडून अनेक उद्योग त्यांचे मन प्रगट करण्याकरिता, व लोकांनी स्वीकार करण्याकरिता, चालले आहेत. अशा प्रसंगी हिंदू लोकास योग्य आहे की, सनातन धर्माचे संरक्षण होऊन त्यास बळकटी यावी, याविषयी जो प्रयत्न उचित आहे, तो अवश्य करावा."[४८] विचारलहरी पत्र एक वर्षातच बंद पडले. विचारलहरीची विचारपरंपरा पुढे चालविणारे आणि ख्रिस्ती धर्मप्रसाराला आवर घालण्यासाठी मुंबईत निघालेले पत्र म्हणजे बापू सदाशिव शेट यांचे 'सद्धर्मदीपिका' हे होय. हे पाक्षिक हिंदूधर्माचा पक्ष उचलून धरुन 'ख्रिस्तीमत-तमा' चा नाश करण्यासाठी जन्माला आले. या पत्राचा पहिला अंक श्रावण शुद्ध ११ गुरुवार शके १७७७ (१८५५) रोजी प्रसिद्ध झाला. "हिंदू लोकास धर्मतत्व कळावे व ख्रिस्तीधर्मी जे पाद्री यांचे धर्माचा पोकळपणा त्यांच्या ध्यानात आणून द्यावा या हेतूने दर एकादशीचे सुमारास म्हणजे महिन्यातून दान वेळा हे काढण्याचा उद्देश धारण केला आहे." असा हेतू पहिल्या अंकाच्या प्रास्ताविकात दिला होता. [४९] ख्रिस्ती धर्मप्रसाराला विरोध व हिंदू धर्माचे समर्थन करणारी नियतकालिके याच काळात अन्यत्रही निघालेली दिसतात. जून १८५४ मध्ये जनार्दन हरी आठल्ये यांचे रत्नागिरीहून 'जगन्मित्र' सुरु झाले. १८५१ साली 'प्रबोध चंद्रोदय' याच हेतूने निघाले. १० ऑक्टोबर १८७१ रोजी 'दंभसहारक' मासिक सुरु झाले.

'ज्ञानोदय' पत्राने प्रथमपासून मराठी भाषेत प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकांचा व वाङ्मयाचा परामर्श घेतला आहे. अर्थात ख्रिस्ती मत खंडणार्थ प्रसिद्ध झालेल्या उपदेशचंद्रिका, विचारलहरी, आणि सद्धर्मदीपिका यांची दखल भा.प. हिवाळे यांनी 'ज्ञानोदयाची पहिली शंभर वर्षे' या संपादनपात पुढीलप्रमाणे घेतली आहे -

"कोणी दुराभिमानी हिंदू आण कोणी नास्तिक मत धरणारे मनुष्य मराठी कागद चालवित होते. त्यांनी केलेल्या ख्रिस्तीधर्माच्या निंदेचा खोटेपणा दाखविण्यासाठी ज्ञानोदय पहिल्याने चालविला. ज्ञानसिंधु इत्यादिक हिंदूधर्मपरायण दुराभिमानी वर्तमान कागदाचे कर्ते ख्रिस्तीधर्माची मोठी हेलना करुन त्यांचे खंडन करण्यास झटत होते. त्याप्रसंगी उपदेशचंद्रिकाही निघू लागली. ती तर विचारलहरी आणि सद्धर्मदीपिका यांची खरोखरी पुढारीण होती."

सन १८५२ यात हिंदूधर्माचे स्थापन करण्याच्या मिसाने परंतु वास्तविक म्हटले तर नास्तिक मत चालविण्याच्या उद्देशाने कोणी विचारलहरी काढीली. तेव्हा ज्ञानोदय लागलीच तिसी संग्रामार्थ उभा राहिला. [५०] ज्ञानोदयाच्या स्वरुपावर व भूमिकेवर यातून प्रकाश पडतो. त्याचप्रमाणे प्रतिपक्षावर तुटून पडताना ज्ञानोदय ग्राम्य भाषेचा आधार घेत नाही. सद्धर्मदीपिकेविषयी १५ सप्टेंबर १८५५ चा ज्ञानोदय म्हणतो, "पुस्तकातील लिहिण्याची चालचलणूक व हलकट शब्दांची मिसळ वगैरे पाहता पोक्त दिसत नाही. हल्ली सद्धर्मदीपिकेचा कर्ता पाद्री लोकास वाद करण्याविषयी आमंत्रण देतानाच ग्राम्य भाषणाचा मासला दाखवितो."[५१]

ज्ञानोदयापासून ख्रिस्ती मतप्रसाराचे प्रयत्न होत असताना धर्मांवरील हल्ल्याचा प्रतिरोध करणारी पत्रेही निघाली. ज्ञानोदय दीर्घायुषी ठरला. आजही ज्ञानोदय मासिक रुपात प्रसिद्ध होत आहे. हिंदूधर्म समर्थनार्थ निघालेली पत्रे मात्र अल्पायुषी ठरली आणि ज्ञानोदयाचे एकोणिसाव्या

शतकाच्या उत्तरार्धातील तेज मावळले आहे. सहा मिशनकडून ज्ञानोदय चालविता जात असला तरी त्याचे ऐतिहासिक, सांस्कृतिक कार्य संपले आहे.

## ३.७ मराठी वृत्तपत्रांचे नवे वळण :

मराठी वृत्तपत्राच्या सुरुवातीच्या तीस वर्षांत ज्ञानप्रसार आणि ख्रिस्ती धर्मप्रसार व त्याची प्रतिक्रिया म्हणून हिंदूधर्माचे बाजूने झालेले संरक्षणात्मक प्रयत्न या दोन प्रेरणा दिसून येतात. १८४० ते १८६१ या वीस वर्षात हिंदू समाजरचनेत हजारो वर्षाच्या परंपरेने दृढत्व पावलेली व समाजाच्या नैतिक आरोग्याचा फन्ना उडविणारी अनेक बांडगुळे इंग्रज राज्यकर्त्यांनी छाटून काढली होती. १८५० साली धर्मांतर करणारांना वडिलार्जित इस्टेटीचे भागीदार बनविणारा कायदा करण्यात आला. १८५६ साली विधवाविवाहाचा कायदा झाला. त्याआधी सतीसारख्या रानटी चालींना कायद्याने आळा घालण्याचा प्रयत्न झाला होता. १८५३ सालापासून रेल्वे सुरु झाली आणि जातिभेदाच्या भिंतीना धक्के बसू लागले. जातिभेदासारख्य बाबतीत रेल्वेच खरी सुधारक बनली. १८५७ साली विद्यापीठांची स्थापना झाली आणि १८६० साली इंडियन पीनल कोडला पक्क्या कायद्याचे स्वरुप देण्यात आले. [५२]. १८६१ ला कौन्सिले अस्तित्वात आली. त्यांची चर्चा करयास वृत्तपत्रांना अवकाश निर्माण झाला. वृत्तपत्राचे स्वरुप प्रथम ज्ञानप्रसाराचे व पुढे हळुहळू सामाजिक व राजकी प्रश्नांकडे वळू लागले. उन्नतीसाठी न्या. म.गो.रानडे, रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनी सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्याची गरज प्रतिपादन करायला सुरुवात केली. सरदार गोपाळ हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी मुंबईत आल्यावर १८६२ मध्ये मुंबईतून 'इंदुप्रकाश' पत्राची सुरुवात झाली. इंदुप्रकाशला सामाजिक सुधारणा व त्यात विधवा विवाहासारख्या प्रश्नांचा पुरस्कार करणारा खंदा सुधारक संपादक लाभला. आगरकरांच्या 'सुधारका' आधी सुमारे वीस वर्षे विष्णुशास्त्री पंडितांनी सामाजिक सुधारणांचे रणशिंग फुंकले होते. विष्णुशास्त्रींनी आपल्या संपादकीय कारकिर्दीत विधवा विवाहाच्या पुरस्कारासाठी

प्रामुख्याने लेखन केले. स्त्रियांच्या बालविवाह, केशवपन, जरठकुमारी विवाह, शिक्षण वगैरे अनेक प्रश्नांची सांगोपांग चर्चा इंदूप्रकाशातून त्यांनी केली. विष्णूशास्त्रींच्या लिखाणात अभ्यास व आवेश यांचा आढळ होत असे. विष्णुशास्त्रींचा विशेष बोलबाला १८७० मध्ये पुनर्विवाहावर झालेल्या वादविवादांमुळे झाला. हा वाद शंकराचार्यांच्या समोर पुण्यात झाला. पुनर्विवाहोत्तेजक जन्म पक्षाचे पाच, सनातन्यांचे पाच आणि सरपंच एक अशा अकरा पंचांसमोर हा वादविवाद नऊ दिवस चालला होता. पुनर्विवाहोत्तेजक पक्षाचे पुढारीपण विष्णुशास्त्री पंडितांकडे होते व सनातन्यांचे प्रमुखत्व त्यांचे गुरुबंधू नारायणाचार्य गजेंद्रगडकरांकडे होते. या वादविवादात पुनर्विवाहोत्तेजक पक्षांचा पराभव झाला. परंतु पंडितांनी आपली बाजू मांडतांना दाखविलेली वादविवादपटूता व विद्ववत्ता प्रशंसनीय होती. पंडितांचे सुधारणाप्रेम बोलघेवडे नव्हते. आपल्या तत्वनिष्ठेचा 'प्रसंग' येताच, स्वतः पुनर्विवाह करुन त्यांनी दिला. [५३] 'इंदुप्रकाश' १८६२ पासून १९२४ पर्यंत असा दीर्घकाळ चालू राहिला. १९०२ पासून तो 'दैनिक' स्वरुपातही निघू लागला. लोकहितवादी, रानडे, तेलंग, यांच्या लेखन-सहाय्याने गेल्या शतकाच्या अखेरीपर्यंत इंदूप्रकाशचा लौकिक एक वजनदार वृत्तपत्र या नात्याने कायम असल्याचे प्रा.न. र. फाटक यांनी म्हटले आहे. [५४]

'इंदुप्रकाश' निघाल्यानंतर रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांनी 'नेटिव ओपिनियन' या नावाने एक साप्ताहिक पत्र सन १९६४ च्या आरंभापासून काढले. 'नेटिव ओपिनियन' सुरुवातीस फक्त इंग्रजीत निघत असे. परंतु दोन वर्षानंतर 'हे पत्र घेऊन वाचावे' अशी केवळ मराठी जाणणाऱ्यास झालेली इच्छा पुरी करण्यासाठी पत्रात मराठी मजकूर देण्यात येऊ लागला. नेटिव ओपिनियनच्या संपादनाची जबाबदारी 'इंदुप्रकाश' ची इंग्रजी बाजू काही काळ सांभाळणारे नारायण महादेव ऊर्फ मामा परमानंद यांच्यावर सोपविण्यात आली होती. भारदस्तपणा, पोक्तपणा, संभावितपणा हे गुण या पत्राच्या मजकुरात होते. नेटिव ओपिनियन

पत्राचा उद्देश, “रागाने कोण आठी घालीत आहे. अथवा लोभाने कोणाच्या चेहऱ्यावर हास्याची छटा दिसू लागली आहे. इकडे लक्ष न देता राजकीय, सामाजिक व नैतिक विषयावर नेटिवांची स्वतंत्र मते प्रसिद्ध करावयाची” हा होता. म्हणून पत्राला नेटिव ओपिनियन हे नामाभिधान देण्यात आले. परंतु त्यावर ‘सरकारास सहाय्य करण्याचा’ चालकांचा हेतू होता. [५५] विष्णूशास्त्री पंडितांनी विधवाविवाहाचा व सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केल्याने इंदुप्रकाशचा बोलबाला सर्वत्र झाला. वर्गणीदार वाढले. रावसाहेब इंदुप्रकाशच्या सामाजिक सुधारणांशी सहमत नव्हते. रावसाहेब मंडलिकांचा सामाजिक सुधारणांपेक्षा इतिहासाचा अभिमान जागृत करण्यावर भर होता. त्यामुळे पत्राचा वाचकवर्गही मर्यादित राहिला. नेमस्तवृत्तीच्या या पत्राचे संपादक मामा परमानंद यांची लेखनशैली सुबोध, चटकदार व मार्मिक असे विवेचन पद्धतीत जोरदारपणा, निश्चितपणा व भारदस्तपणा Dignity असे. ‘इंदुप्रकाश’ प्रमाणे ‘नेटिव ओपिनियन’ चा या काळातील एक प्रमुख पत्र म्हणून उल्लेख करता येतो. रावसाहेब मंडलिक व मामा परमानंद यांच्यामुळे त्याचा बोलबालाही पुष्कळ झाला. भारदस्तपणा व उच्च विचार यांमुळे पत्राची पातळीही उच्च राहिली. नेटिव ओपिनियमनच्या पाठीशी गाढ विद्ववत्ता, स्वतंत्र बाणा व समाजसेवेची तीव्र कळकळ होती. यामुळे नेटिव ओपिनियन पत्र प्रतिष्ठा पावले. तरी १८८५ ते १८८८ या चार वर्षाच्या काळात गाजलेल्या ‘रखमाबाई’ खटल्यात ‘नेटिव ओपिनियन’ ने सनातनी बाजूचाच पुरस्कार केला. राजकीय वृत्तपत्रांच्या ऐन दडपशाहीच्या काळात सन १९०८ मध्ये या पत्राने ‘राम’ म्हटले. केवळ ज्ञानदान व धर्मसंरक्षण हा विचार बाजूला पडून राजकारण व समाजकारण ही वृत्तपत्रांची प्रमुख अंगे झाल्याचे या पत्राच्या वाटचालीनंतर स्पष्ट होते.

## ३.८ सामाजिक चळवळ आणि वृत्तपत्रे :

राजा राममोहन रॉय यांनी बंगालमध्ये 'ब्राह्मोसमाज' स्थापन केला. या समाजाचा धर्मसुधारणा व समाजसुधारणा यासंदर्भात प्रभाव पडला. तत्पूर्वी दादोबा पांडुरंग यांनी १८४९ मध्ये 'परमहंस सभा' स्थापन केली होती. जातिभेदाचा विध्वंस, मूर्तिपूजेच्या प्रघाताचा उच्छेद, विधवा पुनर्विवाहाला उत्तेजन, स्त्री शिक्षणाला महत्व असे परमहंस सभेचे उद्देश होते. या गुप्त मंडळींचा बोभाटा होताच सभेचे काम बारगळले. मात्र नवविद्याविभूषित पहिल्या पिढीच्या पदवीधरांनी विविध धर्म व समाजसुधारणा चळवळींना हात घातला. महाराष्ट्रात न्या.म.गो.रानडे, डॉ. रा.गो. भांडारकर यांच्या पुढाकाराने 'प्रार्थना समाजाची' स्थापना फाल्गुन वद्य ११ शके १७८८, रविवार ता. ३१ माहे मार्च १८६७ रोजी होऊन ईश्वरोपासनेच सुरुवात झाली. 'इंदुप्रकाश' हे प्रार्थना समाजाचे व्यासपीठ होते. [५६] प्रार्थना समाजाचे शंभर वर्ष चाललेले पत्र म्हणजे 'सुबोधपत्रिका' होय. त्यानंतर म. जोतीराव फुल्यांनी 'सत्यशोधक समाज' १८७३ मध्ये स्थापन केला. १९१७-१८ च्या 'माँटेग्यू-चेम्सफर्ड' सुधारणांची घोषणा झाल्यावर ब्राह्मणेत्तर चळवळी उभी राहिली. सत्यशोधक समाजानेही वृत्तपत्र या माध्यमाचा प्रचार-प्रसारासाठी उपयोग करुन शुद्रातिशुद्रांच्या, बहुजनांच्या प्रश्नाला हात घातला होता. स्वामी दयानंदांनी १८७५ मध्ये 'आर्य समाजा' ची स्थापना करुन धार्मिक व सामाजिक प्रबोधनाचा शंखध्वनी मुंबईतच फुंकला होता. या सर्व समाजांचा महाराष्ट्राच्या प्रबोधनात व लोकचळवळीत महत्त्वाचा वाटा होता. आपल्या गरजेनुसार 'वृत्तपत्र' माध्यमांचा या चळवळींनी उपयोग केला आहे.

'सुबोधपत्रिका' हे प्रार्थना समाजाचे मुखपत्र. त्याचा पहिला अंक ४ मे १८७३ रोजी प्रसिद्ध झाला. मनावर व विचारांवर आघात करण्याऐवजी गोडीगुलाबीने विचारांना चालना

द्यावयाची व त्याद्वारा ऐहिक व पारमार्थिक जीवन उच्च पातळीवर न्यावयाचे असा प्रार्थना समाजाचा प्रयत्न होता. 'सुबोधपत्रिके' तून हेच कार्य साधावयाचे होते. सुबोधपत्रिकेत अनेक विषयावर निर्भीड मतप्रदर्शन करण्यात येत असे. स्त्रीशिक्षण, उच्चशिक्षण, नीतिविषयक चर्चा, राजकीय चळवळ, निरनिराळ्या प्रसंगापासून घ्यावयाचे धडे, अशा नाना विषयांवर स्पष्ट विचार मांडण्यात आल्याचे आढळते. [५७] मामा परमानंदानी आपले सर्व लेखन सुबोधपत्रिकेतच आयुष्याच्या अखेरपर्यंत केले. द्वारकानाथ गोविंद वैद्य यांनीही दीर्घकाळ सुबोधपत्रिकेचे संपादन व लेखन केले. डॉ. रा.गो. भांडारकर, न्या. काशिनाथ त्रंबक तेलंग, न्या. म. गो. रानडे, रामभाऊ माडगावकर, शंकर पांडुरंग पंडित, न्या. नारायण गणेश चंदावरकर इ. नामवंतांच्या प्रभावी लेखणींने सुबोधपत्रिकेला भूषविले. नंतरच्या काळातील लेखकांत महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, वसंत नारायण नाईक, प्रा. न.र. फाटक, डॉ. ग.य.चिटणीस होते. सुबोधपत्रिका विशिष्ट तत्वांचा व आचारांचा प्रसार करणारे पत्र असल्याने त्यात वृत्ताला महत्व नसे. हा समाज मूठभर लोकांचा होता. विठ्ठल रामजी शिंदेनी प्रार्थना समाजाचे कार्य मोठ्या जिद्दीने केले. तरी बहुजनांना आकर्षित करु शकला नाही. अच्युतराव कोल्हटकर म्हणतात, 'या समाजाला जनतेला खुलवता आले नाही. सत्यशोधक जलशाला दहा हजार जमायचे. पण प्रार्थना समाजाच्या वाढदिवसाला पन्नासही यायचे नाही.'[५८] सुबोधपत्रिका दीर्घकाळ चालली असली तरी विसाव्या शतकातील वेगवान चळवळीमध्ये तिचे स्थान प्रकाशित होण्यापुरतेच होते.

## ३.९ व्यंगचित्रांची कामगिरी :

ठाणे हे मुंबईच्या नजीक असले आणि १८५३ पासुन मुंबई-ठाणे रेल्वे सुरु झाली असली तरी ठाण्यात १८६६ पर्यंत वृत्तपत्र निघाले नव्हते. मुंबईत वृत्तपत्रांची सुरुवात झाल्यानंतर जवळजवळ चौतीस वर्षानंतर ठाण्यात ज्याला पहिले वृत्तपत्र म्हणता येईल ते 'अरुणोदय' पत्र काशिनाथ विष्णू फडके यांनी सुरु केले. 'अरुणोदाय' चे संपादक रघुनाथशास्त्री होते. त्यानंतर

मात्र स्वतः फडके संपादक झाले. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे चिरंजीव धोंडो काशिनाथ फडके हे संपादक झाले. या पत्राने केसरी-मराठा परंपरेच्या जहाल राजकीय विचारांचा पंथ धरला. कोल्हापूरचे बर्वे दिवाण यांनी 'केसरी-मराठ्या' वर जो बेअब्रूचा खटला भरला होता. त्या प्रकरणात 'अरुणोदय' पत्रही सापडले होते.[५९] 'अरुणोदय' पत्र निघाले तेव्हा मुद्रणाचा तसा बराच प्रसार झालेला होता, तरीही अपसमज संपलेले नव्हते. छापण्याच्या शाईत चरबी वापरली जाते. अशा समजुतीमुळे छापलेले धार्मिक ग्रंथ अशुद्ध समजले जात. या समजुतीमुळे सोवळ्याने वाचण्याकरिता 'श्री गुरुचरित्राची पोथी' तयार केल्याची जाहिरात दि. १४ ऑक्टोबर १८६६ च्या अंकात सापडते. अरुणोदयने ठिकठिकाणी बातमीदार नेमले होते. नव्या वर्षाच्या पहिल्या अंकात मागील अंकातील लेखकांची आद्याक्षरानुसार यादी देण्यात येत असे.

'अरुणोदय' नंतर ठाण्यातच निघालेले वृत्तपत्र म्हणजे 'सूर्योदय' हे पत्र गोपाळ गोविंद दाबक यांनी १८६७ मध्ये सुरु केले. मात्र 'सुर्योदय' पत्राचे कर्ते गोपाळ गोविंद दाबक यांनी सुरु केलेले 'हिंदुपंच' हे व्यंगचित्र साप्ताहिक आपल्या वेगळ्या वैशिष्ट्यामुळे गाजले. हे पत्र १८७२ मध्ये सुरु झाले. हिंदुपंच नावावरुन हे पत्र 'पंच' (Punch) या इंग्रजी व्यंगचित्र साप्ताहिकाला समोर ठेवून सुरु केले असावे, असे दिसते. 'हिंदुपंचा' नंतर व्यंगचित्र स्वरुपाची नियतकालिके निघाल्याचे आढळते. 'पंच' हे नाव 'पंचिनेल्ली (Punchinello) या नावावरुन आलेले आहे. पंचिनेल्लो हे इटलीतील लोकप्रिय असलेल्या कळसूत्री बाहुल्यांच्या खेळातील प्रमुख पात्राचे नाव होते. तो सारा खेळ हास्योत्पादक होता. पंचिनेल्लो हे नावही नेपल्स बाजारात कोंबडीची पिल्ले (पल्सिनेस Pulcinelle) विकायला आणणाऱ्या सतराव्या शतकातील एका शेतकऱ्याला लोकांनी गंमतीने दिलेले होते. त्यांच्या मृत्यूनंतर त्याचे पात्र कळसूत्री बाहूल्यांच्या हास्योत्पादक खेळात नाचवले जाऊ लागले व त्या शब्दाला हास्योत्पादक अर्थ प्राप्त झाला. हा खेळ

इंग्लंडमध्येही लोकप्रिय असल्याने, 'पंच' सारख्या हास्य निर्माण करणाऱ्या नियतकालिकाने लोकांत प्रिय असणारे नाव धारण केले असे दिसते. हिंदुस्थानात इंग्रजी वृत्तपत्रांच्या अनुकरणाने प्रथम जशी इंग्रजी वृत्तपत्रे निघाली; त्याचप्रमाणेच हिंदुस्थानातील पहिले व्यंगचित्र - पत्र इंग्रजी भाषेतच होते. या पत्राचे नाव 'इंडियन पंच' असे होते. [६०] त्यानंतर मराठीत 'हिंदुपंच' अवतरले. उर्दूत लखनौ येथून 'अवध पंच' निघाले. 'अवध पंच' मध्ये व्यंगचित्रे काढणारा 'शौक' हे अरबी टोपण नाव धारण करणारा गंगासहाय नावाचा एक हिंदू चित्रकार होता. पुढे 'दिल्ली पंच', 'पंजाब पंच' अशी दोन पत्रे लाहोर येथे निघाली. मुंबईच्या 'हिंदी पंच' या अँग्लो गुजराती व्यंगचित्र साप्ताहिकाने हे क्षेत्र गाजविले. मराठीत 'हिंदुपंच' १८७२ पासून १८९२ पर्यंत दाबकांनी चालविले. त्यानंतर आपली पत्रे दाबकांनी गणेश कृष्ण शहाणे व आपाजी गोपाळ गुप्ते यांच्याकडे दिली. त्यानंतर 'अरुणोदय' पत्राचे संस्थापक काशिनाथ विष्णू फडके यांचे दुसरे चिरंजीव कृष्णाजी काशिनाथ ऊर्फ तात्या फडके यांनी चालवायला घेतले. तात्या फडके संपादक झाल्यावर 'हिंदुपंचचा' लौकिक सर्वदूर झाला. तो टिळकांच्या राजकारणाचा भरभराटीचा काळ होता. नेमस्त विचारांची टवाळी होत होती. ना. गोपाळ कृष्ण गोखले हे नेमस्ताग्रणी हिंदुपंचाचे लक्ष झाले होते. ना. गोखल्यांनी फिर्याद दिल्यामुळे 'पंच-अजोबां' चा संसार सरकारच्या रोषाला बळी पडून आटोपला. या पत्राबाबत वि.द. घाटे म्हणतात, त्यावेळी 'हिंदुपंच' नावाचे एक विनोदी पत्र निघत असे. त्यातील विनोद म्हणजे शुद्ध टवाळी, उपहास, नालस्ती असे. हिंदुपंचायत गोखले, फिरोजशहा मेहता, वाच्छा, भांडारकर, चंदावरकर, दाजी आबाजी खरे इत्यादि नेमस्तांची व सुधारकांची व्यंगचित्रे येत असत. दाजी आबाजींना पंचआजोबा 'दाजाय-अबजाय' म्हणत. गोखले सूनबाई, मेथा सासूबाई, मेथांच्या हातात मोठे लाटणे असायचे. शिवाय त्या भरघोव दाढीमिशा आणि डोकीवरुन लुगड्याचा पदर.

पंच आजोबांची गोखल्यांवर विशेष मेहरबानी असे. ते गोखल्यांना कधी गाढव बनवित, कधी मरतुकडे तट्टू, कधी गोखल्यांचा पोपट बनवून ते विलायतेला उडून जात आहेत असे दाखवीत. राग गोखल्यांवरच जास्त. त्यावेळच्या पुण्याने खरोखरच गोखल्यांना माणसातून उठवले होते. गोखल्यांना लकडी पुलापलीकडे मान नव्हता, स्थान नव्हते. पंच आजोबा व त्यांच्या गोटातील शिलेदार, बारगीर फत्ते झाले ! लंडनमधील 'पंचा' सारखा खुबीदार बौध्दिक विनोद करण्याइतकी अक्कल कुणाजवळ नव्हती. ज्याच्याबद्दल विनोद केला त्यालाही तो वाचून गंमत वाटावी इतका खेळाडूपणा कोणास नव्हता.' [६१]

हिंदूपंचानंतर मराठीत व्यंगचित्र स्वरुपाची विनोद, विक्षिप्त, 'कटाक्ष', अमावस्या, पौर्णिमेला प्रसिद्ध होणारे 'भूत', तात्या फडके यांनी सुरु केलेले 'विदूषक' अशी वृत्तपत्रं निघाली. आजचे बाळ केशव ठाकरे यांचे 'मार्मिक' याच परंपरेतले व्यंगचित्र साप्ताहिक ठरते. हिंदुपंचाने मराठी वृत्तपत्रांमध्ये नव्या वैशिष्ट्याने नाव गोंदवून ठेवले हे त्याचे विशेष होय.

याच काळात किरण (१८७७), दीनबंधु (१८७७) आदि वृत्तपत्रं प्रसिद्ध झाली. 'किरण' पत्राचे कर्ते माधव बल्लाळ नामजोशी 'केसरी-मराठा' च्या उत्पादकात होते. 'दीनबंधु' पासून सत्यशोधक, ब्राह्मणेत्तर पत्रांची पत्रकारीता सुरु होत असल्याने त्याची चर्चा पुढील प्रकरणात केली आहे. मराठी भाषिक प्रदेशात, जिल्हास्तरावर अनेक वृत्तपत्रे निघाली. समकालीन पत्रकारितेचे स्वरुप पहात असताना त्यांचा विचार प्रबंधरुपात तपशीलाने मांडणे शक्य नाही.

मराठी वृत्तपत्रे मराठी भाषिक प्रदेशात निघाली तरी त्यांची संख्या फार मोठी होती, असे नाही. अनेक पत्रे अल्पजीवी ठरली; तरी नवीन पत्र काढण्याचा उत्साह कमी झाला नाही. शिळा छापाबरोबरच टाईपावर बरीच पत्रे निघू लागली होती. बहुतेक पत्रे साप्ताहिक होती. क्वचित

काही पत्रे पाक्षिक होती. दैनिकांचा प्रारंभ झालेला नव्हता. चित्रांचा वापर जवळजवळ नव्हता. छपाईत सफाई नव्हती, ओबडधोबडपणाच अधिक असे. मजकुराच्या मांडणीत योजकता व कल्पकता नव्हती. बहुतेक पत्रे मराठीबरोबर इंग्रजी मजकुर देत. तत्कालीन वृत्तपत्रे ही मतपत्रे असल्याने वृत्ताला स्थान नव्हते. 'वर्तमानसार' देण्यात येत असे. त्यासाठी इंग्रजी वृत्तपत्रातून हे सार उतरुन घेण्यात येत असे. नेमणुका, बदल्या इत्यादि मजकूर सर्व पत्रात असे. 'वाचकांचा पत्रव्यवहार' हा भाग मात्र संपन्न असे. पुस्तकावर अभिप्राय देण्याची पद्धत प्रथमपासून आढळते.

ज्ञानप्रसाराचे ध्येय अनेक वृत्तपत्रांनी आपल्यापुढे ठेवलेले असले, तरी प्रत्यक्ष व्यवहारात ज्ञानप्रसाराचा अर्थ सामाजिक जागृती व नंतर समाज-सुधारणा व राजकारण यांचा पुरस्कार असा झाला. ज्ञानाने जागृत झालेली बुद्धी समाजातील घडमोडींचा परामर्श घेऊन, मत प्रकट करु लागणे अपरिहार्य होते. यातून सामाजिक, राजकीय प्रश्नांची चर्चा सुरु झाली. [६२] त्यातून विविध पत्रातून तात्विक वाद सुरु झाले. या वादाचा कळसाध्याय पुढील पत्रांतून दिसून आला.

### ३.१० टिळक-आगरकरांची वृत्तपत्रे :

वृत्तपत्रकाराचे पहिले कर्तव्य आपल्या मातृभूमीचे दास्य नष्ट करणे होय, असा थॉमस मन्रोचा सिद्धांत सांगतो. प्रारंभीच्या वृत्तपत्रांनी ज्ञानप्रसाराचे काम हे ध्येय घेऊन चार दशकांची वाटचाल केली होती. इंग्लिश वक्ता एडमंड बर्क याने वर्तमानपत्रांना 'राज्यघटनेचा चौथ चौक' असे साभिमान नामाभिधान दिले आहे. इंग्रजी मुत्सद्दी 'डिझरायली' यांनी पुढील उद्गार काढले आहेत, 'वर्तमानपत्रे ही लोकमताचे प्रतिनिधी होत, ही गोष्ट खरी आहे. संपादक महाशय स्वतःला 'आम्ही आम्ही' असा जो शब्द लावतात तो संख्यार्थी नसून बहूमानार्थी असतो. मग

वाटेल तर त्याला अहंकारार्थी म्हणा ; परंतु सांगण्याचे तात्पर्य हेच की राष्ट्रात राज्यघटनेचा चौथ विभाग, चौथ मजला, चौथा चौक अशी नावे ज्या वर्तमानपत्रांना मिळतात ; त्या पत्रांचे संपादक वर सांगितल्याप्रमाणे स्वयंसिद्ध व स्वतंत्र असतानाही त्यांना प्रातिनिधिक स्वरुपही असते, हा त्या संस्थेचा विशेष गुण होय ![६३]. १८६१ मध्ये कौन्सिले अस्तित्त्वात आली होती. कायद्यावर चर्चा करायला वर्तमानपत्रांना अवसर मिळाला होता. बिपिनचंद्र पाल यांच्या मते १८५८ ते १९०५ हा कालखंड भारतीय राष्ट्रवादाच्या बीजारोपणाचा होता. [६४]. १८७० मध्ये पुण्यात सार्वजनिक सभा स्थापन झाली होती. लोकांना राजकी शिक्षण देणे हा तिचा प्रमुख उद्देश होता.[६५]. अमृत बझार पत्रिका, इंडियन मिरर, संजीवनी, बंगाली, हिंदू, स्वदेशमित्रन, आंध्रप्रकाश, केरळपत्रिका, इंदुप्रकाश, ॲडव्होकेट, हिंदुस्थानी, आझाद, ट्रिब्यून, अखबार-ए-आम यांसारख्या वृत्तपत्रांमधून काँग्रेसचा पाया तयार होत असतानाच मराठी वृत्तपत्राच्या क्षेत्रात निबंधमालेपासून वेगळ्या राष्ट्रीय पर्वाला सुरुवात झाली. १८८१ ला 'केसरी-मराठा' या पत्रांनी मराठी वृत्तपत्राच्या जगात पाऊल टाकले आणि मराठी वृत्तपत्रांना आणि मराठी जीवनाला नवे वळण मिळाले. मालाकार 'विष्णुशास्त्री चिपळूणकर' व केसरी - मराठाकार टिळक-आगरकर या स्वयंसिद्ध स्वतंत्र आणि प्रातिनिधिक संपादकांनी मराठी वृत्तपत्रांना जहाल राष्ट्रवादी मार्ग दाखविला. गोपाळ गणेश आगरकरांनी मात्र विवेकनिष्ठ बुद्धीवादाची बाजू घेऊन १८८८ ला 'सुधारका' चा संसार नेमस्ताग्रणी गोपाळ कृष्ण गोखल्यांना बरोबर घेऊन वेगळा मार्ग निवडला. तरी सामूहिक उत्पादकत्व असलेल्या केसरीचे पहिले संपादक गोपाळ गणेश आगरकरच होते आणि केसरीत पहिली सात वर्ष आगरकरांचे संपादक म्हणून लेखन प्रसिद्ध होत असे. टिळकांना मांडी घालून हातात लेखणी घेऊन मनातून विशेष हौस नसे. [६६] यसन १८७४ मध्ये विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी 'निबंधमाला' हे मासिक सुरु केले. निबंधमालेतून शास्त्रीबोवांनी स्वदेश, स्वधर्म, स्वसंस्कृती यांचा जोराने पुरस्कार करुन त्याविषयी अभिमान

जागृत करण्याचा प्रयत्न केला. [६७] "ज्या लोकास विद्यालयातील शिक्षणाचा वगैरे लाभ न घडल्याने ज्ञानाचा मार्ग खुला नाही. त्यास अनेक गोष्टींचे ज्ञान व्हावे, हा एक निबंध लिहिण्याचा उद्देश आहे. संस्कृत व विशेषतः इंग्रजी भाषेत जे अगाध ज्ञान भरले आहे, त्याचा पाट फोडून जर आपल्या भाषेकडे वळविता येईल तर केवढी मजा होईल !" असा ज्ञानप्रसाराचा निबंधमाला काढण्याचा उद्देश सांगितला असला तरी प्राचीन परंपरा व संस्कृती यांचा गौरव [६८] करण्याचाच मराठी भाषेच्या स्वयंघोषित शिवाजी तथा विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा हेतू होता. "आमच्या देशास काहीएक झाले नाही. त्याची नाडी अद्याप साफ चालत असून शरीरप्रकृतीस काही एक विकार नाही." असे ठासून सांगून त्यांनी आपल्या कार्याला प्रारंभ केला. शेवटच्या अंकात 'इंग्रज या देशात नसते तरी काही बिघडले नसते' असे बेधडक विधान करण्यापर्यंत त्यांची मजल गेली.[६९] सत्ताभ्रष्टतेच्या शल्यातून महाराष्ट्रात नवे सत्वशोधन सुरु झाले.[७०] त्याची सुरुवात निबंधमालेपासून झाली. टिळक - आगरकरांचे मानसिक व वैचारिक भरण-पोषण निबंधमालेतून झाले. भारतीय विचारविश्वात पुनरुज्जीवनवादी, जहाल राष्ट्रवादाची सुरुवात निबंधमालेने केली. लोकमान्य टिळकांच्या संस्कृतिनिष्ठ राष्ट्रवादाची बैठक चिपळूणकरांच्या विचारात आढळते. चिपळूणकरांच्या विचारात अतीत गौरव करतना उथळपणाचा आढळ होत असे. आपले समकालीन जोतीराव फुले यांचा उल्लेख रेव्हरंड फुले आणि 'दीनबंधु' पत्राला कुचाळकीने 'दीनबंटु' असा करीत असत. फुल्यांच्या शूद्रातिशूद्रांसाठी चालविलेल्या लढ्याचे मर्म अतीत गौरवाच्या आहारी गेलेल्या मालाकारांना कळले नाही. तसे चिपळूणकरांच्या विचारावर भरण पोषण झालेल्या टिळक-आगरकरादी संपादकांनाही कळले नाही. निबंधमालेतील विचारसरणीने पुढील काळातील राजकीय मतप्रणालीवर प्रभाव पाडला, हे मात्र निश्चित. सार्वजनिक जीवनात क्रांतीचं पाऊल टाकणाऱ्या टिळक-आगरकरांनी विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या पुढाकाराखाली 'केसरी व मराठा' ही दोन पत्रे सुरु केली. केवळ ज्ञानदान,

जनतेचे मत सरकारला कळविणे असा जो, तोपर्यंत वृत्तपत्रांचा पायंडा होता. तो पूर्णपणे बदलण्यात आला. सरकारी कायदेकानूंची लोकांना माहिती करुन देणाऱ्या, लोकांच्या अडीअडचणी व आशाआकांक्षा सरकारच्या कानावर घालणाऱ्या मध्यस्थाची भूमिका वृत्तपत्रांनी अंगीकारली होती. [७१] ती 'केसरी-मराठा' पत्रांपासून बदलली. इंग्रजी-मराठी मिश्रणाचा गंगाजमनी थाट गेला. 'केसरी' हे मराठी व 'मराठा' हे इंग्रजी पत्र १८८१ पासून निघू लागले. लोकशिक्षणाबराबर लोकांचा स्वाभिमान जागृत करणे, सुस्तावून पडलेल्या समाजपुरुषास जागे करणे, नव्या आकांक्षा निर्माण करुन त्यांची जोपासना करणे, सरकारला जनतेसंबंधीच्या कर्तव्याची कठोरपणे जाणीव देणे, स्वकियांपैकी ज्यांच्याशी मतभेद होतील, त्यांच्यावर टीकेचे प्रहार करणे, मराठीत कोणताही नवा विचार प्रभावीपणे मांडून मायबोलीचे वैभव वाढविणे, अशा विविध रितींनी या वृत्तपत्रांनी आपल्या सामर्थ्यांचा प्रयत्न आणून दिला. या वृत्तपत्रांमुळे सामाजिक व राजकीय क्षेत्रात प्रचंड विचारमंथन सुरु झाले.[७२] वृत्तपत्रे जनप्रबोधनाचे साधन बनली. केसरीचा पहिला अंक ४ जानेवारी १८८१ रोजी प्रसिद्ध झाला. पहिल्या पानावर 'केसरी' पत्र काढण्याचा उद्देश स्पष्ट करणारा लेख होता. त्याला मथळा नव्हता. त्यात म्हटले होते, रस्तोरस्ती रात्री दिवे लागलेले असल्याने व पोलिसांची गस्त सारखी फिरत असल्याने जो उपयोग होत असतो. तोच ज्या जागी वर्तमानपत्रकर्त्याची लेखणी सदोदित चालू असल्याने होत असतो. वर्तमानपत्रकर्ते हे रयतेचे कोतवाल व वकील होत. आम्ही मोठे झ ालो तरी आमचे जुने आंगडे-टोपडे आम्हास अद्याप सुटत नाही. [७३] केसरीचे पहिले संपादक गोपाळ गणेश आगरकर होते. तर 'मराठा' या इंग्रजी पत्राचे संपादक बाळ गंगाधर टिळक होते. इतर उत्पादकांमध्ये विष्णू कृष्ण चिपळूणकर बी.ए., वामन शिवराम आवटे एम.ए., गणेश कृष्ण गर्दे, एल.एम. अॅण्ड एस., महादेव बल्लाळ नामजोशी हे होते. नामजोशींनी 'किरण' नावाचे साप्ताहिक वृत्तपत्र २६ ऑगस्ट १८७७ मध्ये प्रसिद्ध केले होते. 'किरण' च्या

मुखपृष्ठावर सूर्योदयाच्या चित्राखाली "A weekly Journal of Social, and General News, Literature, Politics, Commerce, Science and Arts" असे छापलेले असे. नामजोशी टिळक-आगरकरांसारखे पदवीधर नव्हते. ते खटपटी व कल्पक होते. नामजोशींचे 'किरण' पत्र अल्पकाळच टिकले. पण १८७७-७८ चा दुष्काळ व देशी वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करणारा कायदा याबाबत 'किरण' पत्राने सडेतोड टीका केली. दुष्काळासंबंधीच्या सविस्तर माहितीबरोबरच दुष्काळाची जबाबदारी वगैरेसंबंधी अत्यंत परखड विवेचनही 'किरण' पत्रात प्रसिद्ध होत असे. १८७८ साली देशी वृत्तपत्रांवर निर्बंध घालणारा कायदा जारी झाला, तरी 'किरण' ने आपली निर्भय वृत्ती सोडली नाही. 'किरण' पत्रात मराठीबरोबरच इंग्रजी मजकूरही येत असे. 'किरण' पत्र फार काळ चालू शकले नाही. पुढे त्यांनी 'डेक्कन स्टार' नावाचे इंग्रजी साप्ताहिक १८७९ साली सुरु केले. केसरी-मराठ्याच्या उत्पादकांत सामील झाल्यावर 'डेक्कन स्टार' पत्र 'केसरी' बरोबर निघालेल्या 'मराठा' पत्रात समाविष्ठ करण्यात आले. 'मराठा' पत्राच्या पहिल्या अंकावर "The Mahrratta with which is incorporated the Deccan Star" असे म्हटले होते. नामजोशींच्या अनुभवाचा केसरी, मराठा यांना फायदा झाला असला पाहिजे ; मात्र या दोन भावंडावर नाममुद्रा टिळक-आगरकरांचीच राहिली. या दोघातील वादाने १९ व्या शतकाच्या अखेरचे दशक गाजले.

हिंदुस्थानातील संस्थानिकांचा कारभार हा केसरी-मराठा पत्राच्या संस्थापकांचा आरंभापासून एक आवडता विषय होता. विशेषतः त्रावणकोर, बदोडे, ग्वाल्हेर, इंदूर, हैद्राबाद, म्हैसूर वगैरे संस्थानातील घडामोडींची केसरीने आवर्जून दखल घेतलेली आहे. कोल्हापूरच्या दुर्दैवी राजाची कड घेऊन दिवाण माधवराव बर्वे यांच्यावर जळजळीत टीका केल्यामुळे केसरी व मराठा पत्राच्या संपादकांना डोंगरीच्या तुरुंगात एकशे एक दिवस घालवावे लागले.[७४] त्याचा

फायदा 'केसरी', 'मराठा' पत्रांना झाला. संपादकांचा लौकिक वाढला. टिळक-आगरकर सुटले तेव्हा जोतीराव फुल्यांनी पुढाकार घेऊन त्यांची पुण्यात मिरवणूक काढली होती. मुंबईत सत्यशोधक कामगार पुढारी नारायण मेघाजी लोखंडे यांनी पेढे वाढून आनंद व्यक्त केला होता. मात्र टिळक-आगरकरांनी सत्यशोधक, ब्राह्मणेत्तर बहुजन समाजाची धडपड दृष्टिआड करुनच आपली वाटचाल केली.

इंग्रजी राज्याच्या आरंभी जन्मास येऊन जागे झालेल्या समजुती, प्रतिष्ठित व्यक्ती, संस्था किंवा सार्वजनिक सेवेच्या पद्धती यावर हल्ला चढवून त्यांचा दरारा नाहीसा करावयाचा आणि स्वप्रयत्नानुसार बुद्धित जे स्फुरण येईल त्याचा प्रयोग चालवायचा, अशा साहसी वृत्तीचे टिळक-आगरकर हे प्रतिनिधी होते, असे प्रा. न. र. फाटक यांनी आपले निरीक्षण नोंदविले आहे. [७५] टिळक आगरकर हे मित्र होते व त्यांनी वृत्तपत्रे सामाईक काढली तरी त्यांच्यामध्ये विशेषतः सामाजिक प्रश्नांबाबत मतभेद होते. त्यामुळे केसरीच्या आरंभापासूनच विसंववदी सूर अधूनमधून निघत असे. मूळ उद्दिष्टाबाबत एकमत असल्यामुळे पाचहा वर्षेतरी सामुदायिकरित्या निश्चित केलेल्या धोरणाचा पाठपुरावा केला गेला. पण १८८४ च्या अखेरीस बालविवाहास बंदी घालण्यासाठी कायदा करावा की नाही या विषयावरील वाद निकरास आला. तेंव्हा आगरकरांनी 'वादे वादे जायते तत्वबोधः' हा लेख स्वतःच्या नावानिशी प्रसिद्ध केला आणि त्याचे केसरीतून समर्थनही केले. [७६] बालविवाह, स्त्रीशिक्षण, स्त्री शिक्षणाचे माध्यम आदि विषयांबाबत केसरीकार आगरकरांचे अन्य उत्पादकांशी मतभेद होते. याच मतभेदातून आधी राजकीय की सामाजिक विषयावर आगरकर-टिळक यांच्यात वाग्युद्ध झाले. आगरकरांना ज्या सुधारणा किमान वाटत होत्या. त्या त्यांच्या सहकार्यांच्या दृष्टीने कमाल होत्या. गोडीगुलाबीने लोकांना न दुखवता करावयाचा कारभार थिटा पडला. दि. २५ ऑक्टोबर १८८७ रोजी 'केसरी' पत्राची जबाबदारी आगरकरांवर राहिली नाही. असे अधिकृत घोषित झाले

आणि वर्षभरातच दि. १५ ऑक्टोबर १८८८ मध्ये गोपाळ गणेश आगरकरांनी नेमस्ताग्रणी गोपाळ कृष्ण गोखल्यांना बरोबर घेऊन 'सुधारक' पत्र सुरु केले. ऑक्टोबर १८९० ते एप्रिल १८९१ पर्यंत संमतीवयाच्या बिलावरील संघर्षात आगरकर-टिळकांनी परस्परांवर अतिशय त्वेषाने हल्ले केले. त्याच वर्षी पंडिता रमाबाई रानडेंच्या शारदा सदन प्रकरणी त्यांनी परस्परांवर प्रहार केले. १८९२ च्या एप्रिल महिन्यात केसरीने न्या.रानडे यांच्यावर झोड उठवली. तेव्हा सुधारकाची व केसरीची चांगलीच चकमक उडाली. दि. १४ नोव्हेंबर १८९२ च्या सुधारकात 'टिळक ख्रिस्ती मेसमनच्या हातचा भात व बिस्किटे खातात' असा आरोप केल्याने खळबळ उडाली होती. या वादाची पातळी उत्तरोत्तार खालावत गेली.

'टिळकांच्या मेंदूत बिघाड झाला आहे', असे आगरकर म्हणाले तर 'गंजीवरला कुत्रा, माळावरचा महारोगी' अशा शेलक्या शब्दांचा वर्षाव टिळकांनी आगरकरांवर केला. यावेळी एका वाचकाने इंदुप्रकाशात पत्र लिहून, "आम्ही वर्गणीदारांनी पैसे देऊन टिळक-आगरकर द्वयांची भांडणे घरात विकत आणावयाची या पलीकडे आमच्या वर्गणीचा सध्या जास्त उपयोग दिसत नाही."[७७] अशी आपली नापसंती व्यक्त केली आहे. इंदुप्रकाशच्या इंग्रजी विभागातील पत्रव्यवहारात नाशिकच्या एका वाचकाने आगरकर-टिळकांनी चालविलेला पोरकटपणा, शिवीगाळ ही त्यांच्यासारख्या विद्वानांना शोभत नाही असे बजावले. या आधीच्या वादाप्रसंगी ठाण्याच्या 'अरुणोदय' पत्राने २ नोव्हेंबर १८९० रोजी टीका करताना म्हटले होते. दोघेही 'विचारशून्य, ज्ञानशून्य व हलकट'[७८]

आगरकरांचे 'सुधारक' पत्र 'केसरी' च्या तुलनेने अल्पायुषी ठरले. तरी एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात सुधारणावादाचा झेंडा खांद्यावर घेऊन ते डौलाने फडकले. 'महाराष्ट्रीयास अनावृत्त पत्र' या लेखात आगरकरांनीच म्हटले होते, "दुष्ट आचारांचे निर्मूलन,

सदाचाराचा प्रसार, ज्ञानवृद्धी, सत्यशोधन व भूतदयेचा विचार इत्यादि मनुष्याच्या सुखाची वृद्धी करणाऱ्या गोष्टी विचारकलहाशिवाय होत नाहीत. आजपर्यंत या देशात हा कलह माजावा तितका कधीच न माजल्यामुळे, व बहुधा आमचे लोक 'गतानुगतिक'च असल्यामुळे, हे भारतखंड इतकी शतके अनेक प्रकारच्या विपत्तीत खितपत पडले आहे !"[७९] आगरकरांना Time Spirit कळले असल्याची साक्ष त्यांच्या निबंधांतून, लेखसंग्रहातून मिळते. ते सत्यासमाजी म्हणून, सत्यशोधक म्हणून विचारकलह माजण्याची आवश्यकता प्रतिपादीत नव्हते तरी त्यांच्या विचारधनातून सत्यशोधनच सुरु असल्याचे दिसून येते. "स्वदेशात, स्वलोकात, स्वधर्मात आणि स्वाचारात राहून अविचारी व अज्ञान देशबांधवांच्या निंदेस किंवा छळास न भीता त्यांच्याशी कधी भांडून, कधी युक्तिवाद करुन, कधी लाडीगोडी लावून, अन्यथा सामर्थ्य असल्यास कधी त्यांना दटावून त्यांची सुधारणा करणे यातच खरी देशप्रीती, खरी बंधुता, खरा देशाभिमान, खरे शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे," असे त्यांनी २७ जून १८९२ च्या सुधारकात ठणकावून सांगितले. [८०] सुधारक ही शिवी ठरावी अशा काळात आगरकरांनी आपल्या पत्राचे नाव 'सुधारक' ठेवले. आगरकरांच्या हयातीत सुधारकांची प्रेतयात्रा निघाली तरी आगरकर डगमगले नाहीत.[८१] जेवढी जुनी शास्त्रे तेवढी सारी ईश्वरप्रणीत, त्यांना हात लावणे हे घोर पातक, अशी ज्यांची समजूत, जगत्कारणाच्या तोंडातून, हातातून, मांडीतून व पायातून एकेक वर्ण निघाला, अशी ज्यांची वर्णोत्पत्ती विषयी कल्पना, पंचामृताने व धूपदीपाने केलेली पूजा मात्र ईश्वरास मान्य, याहून ईशपूजेचा विशेष मार्ग नाही, असे ज्यांचे धर्मविचार आहे ही सामाजिक स्थिती अत्त्युत्तम, हीत फिरवाफिरव करण्यास कोठेही अवकाश नाही, सध्या येथे स्त्रियांचे पुरुषाशी, मुलाचे आईबापाशी, जे संबंध चालत आले आहेत तेच उत्तम आहेत व अनंत काल तेच चालले पाहिजेत, ज्ञान संपादणे हे पुरुषांचे कर्तव्य, शिशुसंगोपन हे स्त्रियांचे कर्तव्य, पुरुष स्वामी, स्त्री दासी, स्वातंत्र्य पुरुषांकडे, पारतंत्र्य

स्त्रियांकडे, विवाहाशिवाय स्त्रीस गती नाही व गृहाशिवाय तिला विश्व नाही, वैधव्य हे तिचे महाव्रत्त व ज्ञानसंपादन हा तिचा मोठा दुर्गुण, अशाप्रकारच्या ज्यांच्या धर्मविषयक व समाजविषयक कल्पना, असे लोकाग्रणी काय कामाचे ? [८२] अशी तत्कालीन लोकाग्रणींची, पूर्वगौरवावर आधारलेल्या चिपळूणकर - टिळक पंथाच्या राष्ट्रीय अस्मितेची चिकित्सा आगरकरांनी 'सुधारका' तून केली. 'मनुष्याच्या सुखाची वृद्धी होण्यासाठी' विचारकलह आवश्यक असल्याने 'सुधारक' हे साधन त्यांनी सज्ज केले. मतप्रचार हे आगरकरांच्या पत्रकारितेचे प्रमुख अंग होते. समाजाच्या दृष्टीने निरिश्वरवादाचा पुरस्कार करणारा, वर्णाश्रम व जातीसंस्था यावर कोरडे ओढणारा माणूस समाजकंटकच होता. अशा शिकवणूकीतून भ्रष्टाचार माजणार, सबगोलाकार होणार व समाज रसातळाला जाणार अशी हाकाटी सनातनी मंडळींनी सुरु केली व दुर्देवाने लो. टिळकांसारख्या धुरिणांनी जी शास्त्राधारवादी भूमिका घेतली, त्यामुळे या सनातन्यांचे पारडे जड झाले. [८३] तरी सामाजिक सुधारणा, त्यातही स्त्रीसुधारणांसाठी आगरकर इर्षेने प्रतिपक्षावर तुटुन पडले. बालविवाह, विधवाविवाह, वपन, संमती, स्त्रीशिक्षण यासाठी एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीला आगरकरांनी दिलेला लढा स्त्रीप्रश्नाच्या वाटचालीत महत्त्वाचा ठरला. एकोणिसाव्या शतकातली विचारयुद्धे शब्दसामर्थ्याने केली गेली. वृत्तपत्र व्यवसायाने माणसाच्या वाणीला शस्त्राचे अधिष्ठान प्राप्त करुन दिले, असे आगरकर-टिळकांच्या नंतरच्या काळात टिळक-शाहूंच्या प्रेरण्‌ने आणि पुढाकाराने निघालेल्या पत्रांचा शोध घेताना जाणवते. टिळकांसारखा कुशाग्र बुद्धिमत्तेचा विद्वान, निर्भय, झुंजार नेता, प्रतिपक्षीयांचे वकीलपत्र घेऊन सुधारणावाद्यांना नामोहरण करण्यासाठी झगडत असताना आगरकरांनी विवेकाधिष्ठित इहवादी विचारसरण्‌ी रुजविण्याचा आपल्या परीने प्रयत्न केला. अवतीभोवतीच्या मागसलेल्या, परंपरानिष्ठ समाजातील दुष्ट रुढी, वेडगळ समजुती, चिवट अंधश्रध्दा, जबरदस्त दुराभिमान यावर आपल्या धारदार लेखणीने सतत प्रहार केले, ध्येयसिद्धीचे एक साधन म्हणून आगरकर वृत्तपत्रांकडे वळले. लोकांना त्यांना काही सांगायचे

होते. काहीएक निश्चित मार्ग दाखवून लोकांना विशिष्ट दिशेला त्यांना घेऊन जावयाचे होते. यामुळे स्वाभाविकच त्यांचा पत्रव्यवसाय हा मतप्रसार व ज्ञानप्रसार अशा स्वरुपाचा होता. त्यांचे पत्र वृत्तपत्र असण्यापेक्षा 'मत' पत्रच होते. आगरकरांच्या पश्चात सुधारकात पूर्वीचा जोम राहिला नाही. आगरकरांनंतर सुधारक मागे पडला. 'केसरी' पत्रावर टिळकांचा पूर्ण मालकीहक्क प्रस्थापित झाला. टिळकांच्या नेतृत्वाची उभारणी होण्याचा हा काळ होता. गणपती उत्सव, शिवाजी उत्सवाला हिंदू-मुसलमानांच्या दंग्यांनतर टिळकांनी चालना दिली होती. १८९५ साली पुण्याची 'सार्वजनिक सभा' टिळकांनी काबीज केली, त्यातच दुष्काळ, प्लेग अशी संकटे आली, प्लेगच्या बंदोबस्तासाठी सरकारने नेमलेल्या असिस्टंट कलेक्टर रँडच्या पुण्यात खून झाला. 'टाईम्स' पत्राने खुनाचा संबंध 'केसरी' व पुण्यातील पत्रांशी जोडला. टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला. टिळकांना १८ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. या काळात नरसिंह चिंतामण केळकर आण कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर यांनी संपादकाची जबाबदारी सांभाळली. १८९९ मध्ये टिळकांनी पुन्हा लिहायला सुरुवात केली. तेव्हा सामाजिक सुधारणावाद मागे पडून राजकीय विषयाला महत्व आले होते. ज्ञानप्रसाराचे वृत्तपत्राचे ध्येय बाजूला पडून लोकांत जागृती, कळकळ व संघशक्ती उभी करण्यासाठी केसरी पुढे सरसावला. लॉर्ड कर्झन, शिक्षणाचे डायरेक्टर जॉईल्स, गव्हर्नर लॉर्ड सँडहर्स्ट यांच्या कारकिर्दीवर केसरीने तुफान हल्ला केला. सरकारच्या प्रत्येक धोरणावर टिळक हल्ला करु लागले. शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाला आळा घालण्याच्या उद्देशाने जमीन विकण्याचा त्यांचा हक्क काढून घेणारे एक विधेयक १९०१ साली कायदे कौन्सिलपुढे मांडण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आले. तेव्हा शेतकरी हिताच्या या बिलावरही केसरीने हल्ला केला. कोल्हापूरच्या वैदोक्त प्रकरणात केसरीने, टिळकांनी सनातन्यांचा पक्ष घेतला. टिळकांच्या परंपरा जतन करु पाहण्या ाच्या वृत्तीमुळे सुधारकांपेक्षा कर्मठ धर्माभिमान्यांबरोबर त्यांचे अधिक सख्य जमणे साहजिकच होते. टिळकांची

कॉंझर्व्हेटिव विचारसरणी ही जशी त्यांची एक मर्यादा होती. तशीच त्यांना लोकमान्य बनविणारी ती एक शक्तीही होती. [८४] टिळकांनी आपल्या चळवळीची साधने पुष्कळशी आपणच निर्माण केली. [८५] वर्तमानपत्रकार हा लोकपक्षाचा कुशल, धीट, विचारी व तडफदार वकील असावा असे डॉ. वि.म.भट यांनी आपलया आठवणीत म्हटले आहे. [८६] टिळकांना आपल्या लोकांचे प्रबोधन करुन थांबायचे नव्हते. वाचकांना एका विशिष्ट मार्गाने न्यायचे होते. यामुळे निश्चित ठाम भूमिका ते मांडीत. न्यायाधिशाचा समतोल हा त्यांचा उद्देश नव्हता. एका बाजूची वकिली त्यांना करायची होती. यामुळे एकच एक बाजू कशी योग्य आहे ते टिळक ठामपणाने सांगत. आपल्या मताच्या अनावर कैवाराने लिहिण्याच्या पद्धतीमुळे, लेखनाला एकतर्फी विचार प्रतिपादनाचे रुप कधी येईल. [८७] टिळकांच्या भूमिकेत सनातनी हितसंबंधाचा व हिंदूधर्माचे रक्षणकर्ते असा एक भाग होता. [८८] आपल्या सांस्कृतिक वारशाची, समाजाच्या जडणघडणीची अलिप्तपणे चिकित्सा करुन भारतीय समाजाला आधुनिक रंगरुप देण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा भारतीय संस्कृतीचे प्राचीनत्व हजारो वर्षापूर्वी आर्यांनी सांगितलेले तत्वज्ञान, विविध क्षेत्रात त्यांनी केलेली प्रगती याची महती गाणेच टिळकांना आवडले. पूर्वगौरवार आधारलेली राष्ट्रीय अस्मिता चेतवून स्वराज्याच्या प्राप्तीसाठी जनआंदोलन संघटित करण्यात टिळकांनी उभे आयुष्य वेचले, पण स्वराज्य मिळाल्यानंतर येणाऱ्या काळाचा वेध घ्यावा यअसे भूतकाळात रमणाऱ्या टिळकांना कधीच वाटलेले दिसत नाही असे डॉ. य.दि.फडके यांनी आपले निरीक्षण नोंदविले आहे.

आपल्या विचाराचे वाहन, लोकांपर्यंत विचार पोहचविण्याचे आणि त्यांच्याशी संवाद साधून त्यांच्या मतला विशिष्ट वळण देण्याच प्रभावी साधन, अशा दृष्टीने ते वृत्तपत्राकडे पाहत.[८९] 'पक्षाभिमान हा वृत्तपत्रकाराच्या अंगी दोषापेक्षा गुणच अधिक ठरतो. पण बंदुकीतून सुटलेल्या गोळीप्रमाणे संपादकीय मत निश्चित, अचूक मर्मभेद करणारे व ठणठणीत असावे'

ही अनुभवाची सूचना त्यांनी केसरीच्या संपादनपाचे दीर्घकाळ काम करणाऱ्या न.चिं. केळकर यांना दिली होती. वृत्तपत्रांचे स्वरुप व कार्य याविषयी टिळकांनी प्रसंगाप्रसंगाने मांडलेले विचार पुढिलप्रमाणे -

१. ''जेणे करुन समाजाचे व्यापार सुरळीत चालण्यास मदत होईल असे लोकमत जागृत करणे व जो कोणी याकामी व्यत्यय आणील त्याचे स्वरुप विष्कारण करुन वेळीच बंदोबस्त करणे हे वर्तमानपत्रांचे मुख्य कर्तव्य आहे.''

२. ''गुळगुहीत कागदावर रंगीबेरंगी बुळबुळीत मजकूर छापून लोकांचे रंजन करणे हे काही वृत्तपत्रांचे मुख्य कर्तव्य नव्हे.''

३. ''सरकारच्या आवडीकरिता आम्ही वृत्तपत्रे काढली नाहीत व सरकारवर कडक टीका केल्याने त्याचा रोष आमच्यावर झाला तरी त्याची आम्हास पर्वाही नाही. सरकारच्या जुलमी राज्यपद्धतीवर जाचेल असे निर्भीडपणे म्हणावयाचे नाही तर वर्तमानपत्र काढावे तरी कशाला ?''

४. ''वीस वर्षापूर्वी राजकयी बाबतीत जे लेख येत असत ते प्रायः राज्यकर्त्यास सुशिक्षित वर्गाचे मत समजून देण्याकरिताच असत, व त्यामुळे राज्यकर्त्यांस गोड न वाटली, तरी कडून न वाटेल अशा भाषेतूनच लिहिण्याचा प्रघात असे. पण ही दिशा आता थोडी पालटली आहे. आम्ही 'केसरी'त जे लेख लिहीत असतो ते केवळ राज्यकर्त्यांकरीता नसून, आमच्या मनातले विचार, आमच्या मनातली तळमळ, किंवा जळफळ सर्व मराठी वाचकांच्या मनात उतरावी एवढ्याकरिताच आहेत व आमच्या लेखांचा जर असा परिणाम होत नसला, तर आमचे श्रम फुकट गेले असे समजू''[१०] केसरीत ब्राह्मण वर्चस्वाचे समर्थन आढळते. हिंदूधर्म रक्षणाची टिळकांची भूमिका हीच केसरीची

भूमिका होती. महात्मा फुल्यांच्या शूद्रातिशूद्रांच्या चळवळीची केसरीने दखल घेतली नाही. आगरकरांनाही त्याचे आकलन झाले नव्हते. टिळकांनी समाजचे व्यापार सुरळीत चालविण्यास आगरकर, न्या. रानडे, डॉ. भांडारकर, न्या. तेलंग तसेच पुढील काळात छत्रपती शाहू यांचा व्यत्यय येईल असे दिसताच त्यांविरुद्ध शब्दशस्त्राचा मारा करुन पूर्वगौरवावर आधारलेली राष्ट्रीय अस्मिता टिळक जागृत करीत राहिले. केसरी-सुधारकाचे मतपत्र हेच स्वरुप दिसून येते. देशातील चळवळ यथास्वरुप प्रकट करण्याचे धैर्य वृत्तपत्रांनी दाखविले. ही पत्रकारिता 'प्रेरित पत्रकारिता' होती.

## ३.११ प्रबोधन चळवळ आणि वृत्तपत्रे :

मराठी वृत्तपत्रे आणि सामाजिक, राजकीय चळवळी यांचा अन्योन्य संबंध आहे. आपल्या चळवळीची साधने म्हणूनच वृत्तपत्रांचा वापर संपादकांनी केला. प्रा. न.र.फाटक यांनी याचे नेमकेपणाने विश्लेषण केले आहे. ते म्हणतात, वृत्तपत्राच्या प्रसाराच्या कारणांपैकी एक म्हणजे संपादकांच्या हाती असलेली चळवळ हे होय. देशात विचारकलहाच्या ज्वाला पेटलेल्या असल्या की, वृत्तपत्रांविषयीची अभिरुची लोकांत बळावते, असा अनुभव आहे. विष्णुशास्त्री पंडितांची 'विधवा विवाहाची' चळवळ सुरु झाल्याबरोबर इंदुप्रकाशची लोकप्रियता वाढली, ज्ञानप्रकाशालाही बाळसे चढले. पुढे काँग्रेसच्य चळवळीने अनेक वृत्तपत्रांच्या नशिबाचे पारडे जड केले. संमतीवयाच्या कायद्यावरुन देशात अनुकूल-प्रतिकूल विचारांचे रण माजताच केसरी-सुधारकाकडे लोकांची दृष्टी अधिक जाऊ लागली. संपादकाच्या अंगी चळवळीचा पुढारीपणा घेण्याची हिंमत व ताकद असेल तर पुढारीपणाच्या मागोमाग त्यांच्या वृत्तपत्रांचा उत्कर्ष होत असतो. [११] हिंदुस्थानात राजकारण हा एक लोकांच्या जिव्हाळ्याच्या विषय असल्याने राजकीय विचारजागृतीला वाहून घेणाऱ्या वृत्तपत्रांची संख्या मोठी दिसते. राजकीय ऊर्जितावस्थेच्या लढ्यातील सैनिक या नात्याने वृत्तपत्रे आपले कर्तव्य करीत आली.

दडपशाहीच्या काळातही त्यांनी टिकाव धरला. वृत्तपत्रे आली व गेली पण त्यांनी जे कार्य अंगीकारले होते ते लोकजागृतीचे कर्य वाढत्या जोमाने फैलावत जाऊन दडपशाहला ह्याच्यापुढे हार खाण्याची पाळी आली, असा वृत्तपत्रांचा विजयी इतिहास [९२] असल्याची साक्ष प्रा. न.र.फाटक यांनी दिली आहे. टिळकांप्रमाणेच शाहू महाराजांनीही वृत्तपत्राच्या साधनाचा आपल्या सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यासाठी उपयोग करुन घेतला. शाहूंनी स्वतः वृत्तपत्राचे उत्पादकत्व पत्करले नाही. पण 'धुरिण पत्रकारिते' च्या विरुद्ध 'प्रतिधुरिण पत्रकारिता' शाहूंनी उभी केली. अनेक वृत्तपत्रांना आणि वृत्तपत्रकारांना शाहूंनी मदत केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केलेल्या 'मूकनायका' लाही शाहूंनी मदत केली. ब्राह्मणेत्तर चळवळीच्या आणि दलित चळवळीच्या प्रसाराबरोबरच ब्राह्मणेत्तर, दलित पत्रांचा प्रसार वाढला. 'चळवळ आणि वृत्तपत्रे' एवढ्याकरीता हा मुद्दा येथे उपस्थित केल आहे. पुढील प्रकरणात अभ्यासक बहुजनलक्षी सत्यशोधक व ब्राह्मणेत्तर पत्रांची चर्चा करणार आहे.

महाराष्ट्रातील राजकीय चळवळीच्या ओघाबरोबर मराठी वृत्तपत्रांची प्रगती होत गेली. या चळवळींना जसजशी गती येत गेली तसतसा वृत्तपत्र व्यवसाय गुणाने आणि संख्येने भरदार झाला. [९३] वृत्तपत्रांच्या प्रसाराला चळवळीबरोबरच आणखी एका गोष्टीची साथ मिळाली ती म्हणजे महायुद्धे, महायुद्धाने वृत्तपत्रसृष्टीत असामान्य क्रांती घडवून आणली. जगातील सर्व मुत्सद्यांना वृत्तपत्रांचे महत्व समजून आल्यामुळे प्रत्येक राष्ट्राने आपल्या बाजूला वृत्तपत्रांचे सामर्थ्य वळवून घेतले. आपले सैन्य, आरमार आणि दारुगोळा यांच्याइतकेच नव्हेतर त्याहून जास्त सामर्थ्य आपणास देशातील प्रमुख वृत्तपत्रांमार्फत मिळणार आहे ही गोष्टी धूर्त मुत्सद्यांनी ओळखली. महायुद्धामुळे सर्व जगातील जनतेत युद्धाच्या बातम्या वाचण्याची आवड फार मोठ्या प्रमाणात उत्पन्न झाली आणि त्यामुळे वृत्तपत्रांचा खपही वाढला. [९४] लोकमान्य टिळकांनी या काळात सैन्यभरतीसांठी दौरा करुन 'सैन्यात भरती व्हा' असे आवाहन भारतीयांना केले

होते. महायुद्धात गेलेल्या पलटणींना नव्या जगाचा परिचय त्यातून झाला. महारपलटणीतल्या सैन्याला आपणशी शूर, वीर, क्षत्रिय असल्याचा साक्षात्कार झाला नसेल तर नवलच ठरले असते.

## ३.१२ मराठी वृत्तपत्रांची वाढ :

- १८७१-७२ च्या अहवालात ५९ वृत्तपत्रे असल्याची नोंद सापडते. त्यापैकी २९ मराठी पत्रे होती. मराठी पत्रांपैकी १३ टाईपावर छापली जात व बाकीची शिळा प्रेसवरची असत. ९ मराठी पत्रे मराठीबरोबर इंग्रजी मजकूरही प्रसिद्ध करीत.
- १८७६-७७ च्या अहवालात देशी वृत्तपत्रांची संख्या ६५ वर गेल्याचा उल्लेख आहे. मराठी पत्रांची संख्या ४० होती. एक मराठी पत्र दैनिक होते. आठ मराठी पत्रात इंग्रजी मजकूरही असे. धारवाड, हुबळी, कळघटगी या कन्नड भागातही मराठी पत्रे होती व त्यात थोडा कन्नड मजकूरही असे.
- १८८०-८१ च्या अहवालात देशी भाषेतील वृत्तपत्रांची संख्या ७६ पर्यंत गेल्याची नोंद सापडते. म्हणजे सरकारी अहवालाप्राणे दहा वर्षात (१८७१-८०), दर वर्षाची वटघट होऊनही मराठी पत्रांची संख्या २९ वरुन ४१ वर गेली.
- १८८५ साली मराठी पत्रांची संख्या ५९ हाती. [९५]

## ३.१३ वृत्तपत्रांच्या विकासाचे कालखंड :

विविध अभ्यासकांनी वृत्तपत्रांच्या विकासाचे कालखंड वेगवेगळे मानले आहेत. रा.गो.कानडे यांनी मराठी नियतकालिकांच्या इतिहासात तीन कालखंड कल्पिलेले आहेत.

१. १७७० ते १८३५ अँग्लो इंडियन पत्रांचा कालखंड

२. १८३५ ते १८८५ अँग्लो इंडियन वृत्तपत्रांच्या अनुकरणातून देशी भाषेतून वृत्तपत्रे

निघू लागली. या कालखंडातील वृत्तपत्रे इंग्रजी - मराठी, इंग्रजी - हिंदी, इंग्रजी - बंगाली अशा जोडभाषेत निघत.

३. १८८५ ते १९३५ राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून नवा मनु सुरु झाला आणि राष्ट्रीय विचारांची वृत्तपत्रे सुरु झाली. त्यांनी भारतवर्षातील जनतेत राष्ट्रीयत्वाच्या कल्पना चांगल्या सजविल्या. एक राष्ट्रीयत्वाची भावना हिंदी राष्ट्रात कायम करण्यात आणि राष्ट्रीय जागृती करण्यात राष्ट्रीय वृत्तपत्रांनी अतिशय महनीय कामगिरी केली. [९६]

हे कालखंडाचे मापन ढोबळ ठरते. कारण १८३२ ला बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' पत्र सुरु केले होते, तर १८८१ ला संपूर्ण मराठीत 'केसरी' आणि इंग्रजीत 'मराठा' ही वृत्तपत्रे प्रकाशित होऊ लागली होती. त्या मानाने श्री. शं. नवरे यांनी कल्पिलेले वृत्तपत्रांच्या अवस्थांतराचे मापन योग्य वाटते. ते म्हणतात, वृत्तपत्रे ही सामाजिक जागृतीचे कारण व कार्य असतात. म्हणजे जागृतीतून ती जशी निर्माण होतात तशी ती जागृतीला सहाय्यही करतात. लोकजागृतीच्या परिवर्तनाबरोबर वृत्तपत्रांच्या ध्येयधोरणातही परिवर्तने होत जातात. प्रथम पारतंत्र्याची जाणीव होणे, ही जाणीव झाल्यावर ते का आले व कसे दूर होईलया याबद्दल विचार सुरु करणे आणि या विचारांचे प्रत्यक्ष आचारात रुपांतर होणे या जागृतीच्या तीन अवस्था स्थूलमानाने समजल्या तर इंग्रजी आमदानीत १८८० पर्यंत भारत पहिल्या अवस्थेत, १८८० ते १९२० पर्यंत भारत दुसऱ्या अवस्थेत आणि त्यानंतर तिसऱ्या अवस्थेत होता, असे सामान्यतः म्हणण्यास हरकत नाही. [९७] मराठी वृत्तपत्रांच्या विकासाच्या दृष्टीने पुढील कालमापन विचारात घेण्यास योग्य वाटते.

इ.स. १८३२ ते १८४०-४१ हा 'दर्पण' ते 'प्रभाकर' पर्यंतचा काळ मराठी वृत्तपत्रांच्या जडणघडणीचा काळ होता. इ.स. १८४०-४१ ते १८७४ म्हणजे 'प्रभाकर' पासून तो विष्णू कृष्ण चिपळूणकरांच्या 'निबंधमाले' पर्यंतचा काळा हा मराठी वृत्तपत्रांच्या दृष्टीने पायाभरणीचा होता.

इ.स. १८७४ ते १८८१ म्हणजे 'निबंधमाला' ते 'केसरी', 'मराठा' ची स्थापना होईपर्यंतची सहा-सात वर्षे ही मराठी वृत्तपत्रसृष्टीत विविध प्रकारचे बदल घडविणारी ठरली. [१८]

मराठी वृत्तपत्रसृष्टीची जडणघडण विसाव्या शतकात वेगाने झाली. १९१७ ला 'जागरुक', 'जागृती' १९१९ ला 'विजयी मराठा' आदि ब्राह्मणेत्तरांची पत्रे सुरु झाली. १९२० पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'मूकनायक' पत्र सुरु झाले. या पत्रापासून दलित पत्रकारितेचा प्रवाह मराठी वृत्तपत्रसृष्टीत सुरु झाला. वरील मीमांसकांनी पाडलेले कालखंड सुशिक्षित पांढरपेशा वर्गाच्या वृत्तपत्रांचे दिग्दर्शन करणारे असून, बहुजनकेंद्री ब्राह्मणेत्तर, दलित पत्रकारितेचा विकास पुढील कालखंडातच झालेला दिसून येतो.

कमरणूकने शेकडो लहान मुलामुलांना वाचनाची अगदी बालवयातच गोडी लावली. प्रौढ स्त्रियात वाचनाची आवड निर्माण करुन वाङ्मयीन अभिरुची उत्पन्न करण्याचा बुद्धिपुरस्सर 'करमणुकी' ने प्रयत्न केला. सत्तावीस वर्षे चालून १९१७ ला ते बंद झाले. 'करमणूक' पत्र साप्ताहिक होते, १८९० ते १९१७ या कालखंडात ते चालले म्हणून त्याच्या वेगळेपणसह त्याचा इथे निर्देश केला आहे.

'महाराष्ट्र' पत्राचे धोरण जहाल राष्ट्रीय पक्षाच्या राजकारणाचा पुरस्कार करणे हे होते. हे पत्र उघडउघड टिळकसंप्रदायी होते. टिळकांच्या ह्या व पुढेही काही वर्षे 'केसरी' आणि 'महाराष्ट्र' यांच्या विचारात व प्रचारात विलक्षण साम्य असे. एवढे गोपाळराव व त्यांचा

'महाराष्ट्र' टिळक विचारसरणीशी नुसता समरसच नव्हे तर एकजीव झालेला होता. [९९] मात्र टिळकांच्या मृत्यूनंतर हे धोरण बदलले. कोणत्याही पक्षाची पक्की बांधीलकी न पत्करता, प्रत्येक प्रश्नाचा स्वतंत्र वृत्तीने, साधक - बाधक विचार करुन त्यानुसार 'महाराष्ट्रात' मत मांडण्यात येई. पुढे रिस्ले सर्क्युलरविरुद्ध नागपुरातील विद्यार्थ्यांचा संप, १९२५ साली स्वराज्य पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेले तांबे यांचे दिवाणपद, १९३७ ची निवडणूक अशाप्रसंगी 'महाराष्ट्र' पत्राने 'केसरी' शी दोन हात केले. 'महाराष्ट्रा' च्या स्वतंत्र भूमिकेमुळे काँग्रेसच्या काही कार्यक्रमाला त्याचा पाठिंबा असे, तसे हिंदू महासभेलाही या पत्रात स्थान मिळे. प्रसिद्ध साहित्यिक गजानन त्र्यंबक माडखोलकर यांचे 'महाराष्ट्रा' तील वाड्मय परीक्षणाचे व साहित्यविषयक चर्चेचे सदर त्यांच्या वीस वर्षांच्या कारकिर्दीत गाजले. या सदराने महाराष्ट्रातील सर्व साहित्यिक विद्वानांचे लक्ष वेधुन घेतले. दादासाहेब ओगले यांनी राजकारणाचा प्रभाव असलेल्या काळात वृत्तपत्राच्या चौकटीत बदल करण्याची उपक्रमशीलता दाखविली. महाराष्ट्रात गाजलेल्या 'खान-मालिनी' विवाहाच्या संदर्भात आक्षेपकांवर जळजळीत टीका माडखोलकरांनी दुसऱ्या एका पत्रातून केली होती. त्यामुळे 'महाराष्ट्रा' च्या संपादक मंडळातून त्यांना काढून टाकावे, असेही सुचविण्यात आले होते. मात्र ओगले यांची वृत्ती दिलदार होती. त्यामुळेच त्यांनी माडखोलकरांच्या बाबतीत सौजन्य दाखविले. केसरी परंपरेच्या 'महाराष्ट्र' पत्राने व्यापक व प्रगमनशील दृष्टिकोन ठेवला. संपादक मंडळात साम्यवादी, हिंदुसभावादी, विलक्षण मते बाळगणारे असे सर्व निर्वेधपणे वावरु शकले. सामाजिक सुधारणेला पाठिंबा, स्वदेशीचा प्रचार व लोकसंग्राहक वृत्ती हे दादासाहेबांच्या कारकिर्दीतील वैशिष्ट्य असले तरी नागपूर प्रांतातील ब्राह्मणेत्तार चळवळीशी [१००] त्यांचे जमले नाही. 'महाराष्ट्र' पत्र प्रथम सतरा वर्षे साप्ताहिक होते. पुढे १९३० पासून द्विसाप्ताहिक झाले. १९४७ साली त्याचे संपादक पु.दि. ढवळे यांनी दैनिकात रुपांतर केले. पुढे दैनिक महाराष्ट्र

'शिवराज प्रकाशन' या नावाने पब्लिक लिमिटेड कंपनीमार्फत चालविला गेला. आर्थिक अडचणीच्या काळात कर्मचारीवृंदाने सहकारी तत्वावर चालविण्याचा प्रयत्न केला. पण अखेर १९७७ साली पत्राची इतिश्री झाली. मराठी वृत्तपत्रसृष्टीतील मैलाचा दगड, खुणेचा स्तंभ असेच त्याचे स्थान होते.

## ३.१४ मराठी वृत्तपत्रांचे 'कोल्हटकरी' वळण :

१९०८ साली 'देशसेवक' पत्राचे संपादक म्हणून आपल्या वृत्तपत्रीय कामगिरीला अच्युत बळवंत कोल्हटकरांनी सुरुवात केली. संपादकाच्या वाट्याला न चुकता येणारा तुरुंगवासही भोगला, याचा उल्लेख 'देशसेवक' पत्राची कामगिरी स्पष्ट करताना अभ्यासकाने याआधी केला आहे. 'देशसेवक' पत्र नागपूर - वऱ्हाड प्रांतातले नेमस्त पत्र होते. अच्युतरावांच्या संपादकीय काळात पत्राचा नेमस्त अवतार बदलला आणि अच्युतरावांच्या वडिलांनी त्यांना घराबाहेर काढले. त्यानंतर अच्युतरावांनी नागपूरला स्थिर न होता मुंबईसारखे बहुरंगी आणि विविधढंगी शहर कार्यक्षेत्र म्हणून निवडले. साप्ताहिकांना वृत्तपत्र समजण्याच्या जमान्यात दैनिक लोकप्रिय होऊ शकते हे अच्युतरावांनी दाखवून दिले. टिळकांची परंपरा सांगणारा हा संपादक सामाजिक व अन्य बाबतीत त्यांच्यापुढे दोन पावले जाऊन विचार करणारा आणि काळाचे नीट भान ठेवणारा होता. [१०१] समाजासाठी तळाच्या लोकांपर्यंत वर्तमानपत्र आणि त्याद्वारा राजकीय आणि अन्य जागृती अच्युतरावांनी नेऊन पोहचविली व मराठी वृत्तपत्राच्या कक्षेत नवा वाचकवर्ग त्यांनी आणून सोडला. एखादी गोष्ट करावयाची म्हटली की, तीत बेधडक सर्व शक्तीनिशी स्वतःला झोकून द्यावयाचे, अशी त्यांची वृत्ती असल्याने, अच्युतरावांची पत्रे लोकप्रिय होऊनही स्थिर होऊ शकली नाहीत. अच्युतरावांनी आपले दैवत जे लोकमान्य टिळक त्यांच्यावरही अक्षम्य टीका केल्याने त्यांची लोकप्रियता जी

घसरली ती परत त्यांना कधीच सावरता आली नाही. 'हिंदूपंच' च्या तात्या फडके यांच्या प्रांतात त्यांनी जणू प्रवेश केला होता.

'संदेश' कार कोल्हटकरांनी देशसेवकानंतर 'श्रुतिबोध' (१९१२ ते १९१४), 'उषा' (१९१३) ही मासिक सुरु केली होती. तरी अच्युतराव कोल्हटकरांचे नाव काढताच 'संदेश' पत्राचीच आठवण येते. १९१५ पासून १९३० पर्यंत 'संदेश' पाच वेळा बंद पडले. त्यापैकी तीन वेळा दैनिक म्हणून; तर एकदा साप्ताहिक म्हणून अच्युतरावांनी त्याचे पुनरुज्जीवन केले. याच काळात संपादक, लेखक म्हणूनही अनेक वृत्तपत्रांत ते हौसेने काम करीत राहिले. टिळकांच्या राजकारणाला पुढे न्यावयाचे असेल तर, केवळ मध्यमवर्गीय पांढरपेशा वर्गावर विसंबून न राहता, त्यापलीकडे कामगारादी वर्गातही वृत्तपत्राद्वारे पोहचले पाहिजे. सत्यशोधक चळवळीमुळे ग्रामीण भागात सर्वत्र टिळकांविषयी राग नसला, तरी मोठी ओढ होती असेही म्हणता येणार नाही. [१०२] टिळकांच्या राजकारणातली नेमकी उणीव ओळखून सामान्य वाचकाला आवडेल, रुचेल असे दैनिकपत्र मकर संक्रांतीच्या दिवशी १४ जानेवारी १९१५ रोजी प्रसिद्ध केले. त्याची जाहिरात 'केसरी' च्या १२ जानेवारी १९१५ च्या अंकात दिली होती. वार्षिक वर्गणी ९ रुपये होती. १९ जानेवारी १९१५ च्या 'केसरी' तील अभिप्रायात म्हटले होते, उद्योगी, उत्साही, कसलेल्या संपादकांच्याद्वारा मराठी वाचकवर्गास प्रत्यही मिळणारा संदेश चटकदार असेल याविषयी आम्हास मुळीच संशय नाही. [१०३]

अच्युतरावांनी मतपत्राचे वळण जरी कायम ठेवले तरी सामान्य वाचकांसाठी 'बातम्या' मिळवून छापल्या. लाल, काळ्या, हिरव्या शाईत 'संदेश' छापून लोकांना आकर्षित करुन घेतले. पुण्यामुंबईत दर शनिवारी-बुधवारी होणाऱ्या नाट्यप्रयोगाच्या बातम्याही आपले वार्ताहर नियमित पाठवून प्रसिद्ध करण्याची दक्षता ते घेत. आज देशातील सर्वच पत्रात क्रिकेट खेळाचे

व क्रिकेट स्टारचे वृत्त वाचायला मिळते. मराठी वृत्तपत्रात क्रिकेटची रसाळवर्णने देण्याची प्रथाही संदेशनेच सुरु केली. अच्युतरावांच्या पुढे मुंबईतील सरळमार्गी मध्यमवर्गीय पांढरपेशा समाज जसा होता, तसा गिरणगावातील श्रमजीवी वर्गही होता. शिवरामपंत परांजपे, तात्यासाहेब केळकर वा काकासाहेब खाडीलकर यांनी १९२० पर्यंत वृत्तलेखन पुण्यात केले. त्यांच्यापुढे मध्यमवर्गीय वाचकवर्ग प्रामुख्याने होता. सत्यशोधकांच्या, बाह्मणेत्तरांच्या आणि अस्पृश्यांच्या चळवळीची दखल अच्युतराव आवर्जून घेत. दिनकरराव जवळकरांसारख्या ब्राह्मणेत्तर पुढाऱ्याबरोबर अच्युतरावाचं घनिष्ठ संबंध होते. मुंबईच्या कामगारावर्गाचे विस्मरण अच्युतरावांना होणे शक्य नव्हते. [१०४] टिळक व आगरकर यांची तुलना करताना आपली टिळकांवरची अपरंपार भक्ती आड येऊ न देता, आगरकरांना योग्य तो न्याय त्यांनी दिला. यामुळे गांधीजींचे नेतृत्व स्वीकारताना त्यांनी उगीच खळखळ केली नाही. अच्युतराव टिळकभक्त असले तरी ब्राह्मणेत्तर चळवळ, अस्पृश्योद्धार इत्यादि प्रश्नांबाबत त्यांची भूमिका पुरोगामी होती. म्हणूनच जोतीराव फुले यांची अनुल्लेखाने उपेक्षा होत असतानाच्या काळात, जोतीराव हे टिळक, आगरकर, गोखले यांच्या तोडीचे नेते होते, असे अच्युतरावांनी आग्रहाने सांगितले. [१०५] जेवणाच्या पंक्तीत, देवळाचे दारात, पाणवठ्याच्या जागेवर, एवढेच काय, मसणवटीतदेखील ब्राह्मणेत्तरांची मने रोज रक्तबंबाळ केली जात आहेत. ही मने पुन्हा सांधली पाहिजेत. माजघर, देवघर, पाणीघर किंवा न्हाणीघर ह्या सर्व ठिकाणी ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर एक असा प्रयत्न खुद्द ब्राह्मणांनी केला पाहिजे, असे ठणकावून सांगणारे अच्युतराव 'ब्राह्मणेतर वर्गास दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी चाललेली जी चळवळ तीच ब्राह्मणेत्तर चळवळ होय.'[१०६] अशी ब्राह्मणेतर चळवळीची व्याख्या करतात. 'ब्राह्मण-अब्राह्मण' या लेखात त्यांनी पुढीलप्रमाणे चर्चा केली आहे, ''ब्राह्मण-अब्राह्मण या चळवळीचा आम्हास यत्किंचितही विषाद वाटत नसून ही आपल्या देशात उत्पन्न झाल्याबद्दल आम्हास अंतःकरणपूर्वक आनंद होत आहे.

ब्राह्मण-अब्राह्मण चळवळ उद्‌भवली म्हणजे त्याचा अर्थच असा की, हिंदुस्थानातील जनता खडबडून जागी झाली असून आमचे हक्क आम्हास पाहिजेत अशी आकांक्षा तिच्या मनात उत्पन्न झाली आहे." [१०७] अच्युतरावांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या दलित मुक्तीसंग्रामाचीही दखल घेतली होती. नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना लिहिलेले पत्र 'मौज' साप्ताहिकाच्या २२ जुलै १९३१ च्या अंकात प्रसिद्ध झाले आहे. पत्रात अच्युतराव म्हणतात,

"हिंदूधर्मात अस्पृश्यता उत्पन्न होऊन हिंदूधर्माच्या एकंदर औदार्यास विनाकारण संकुचितपणा आलेला आहे, ही गोष्ट स्पष्ट, निःसंशय आहे, त्याचप्रमाणे हिंदूधर्मातच काय, पण जगातील कोणत्याही धर्मात अथवा समाजव्यवस्थेत कृत्रिम उच्चनीचता आणि अधिकाराची कृत्रिम वाटणी नसावी हेच खरे आहे. अस्पृश्यता नाहीशी करण्याचे जे मार्ग सध्या चालू आहेत, त्यामध्ये नाशिकमध्ये चाललेल्या सत्याग्रह मला पूर्णपणे संमत आहे. आणि माझी सर्व स्पृश्यवर्गास कळकळीची विनंती आहे की, हिंदूधर्मातील प्रत्येक व्यक्तीस देवमंदिरात जो जाण्याचा हक्क आहे, तो त्यांनी ताबडतोब अस्पृश्यवर्गास दिल्यावाचून राहू नये." [१०८] टिळकांचे परमभक्त अच्युतराव सामाजिक बाबतीत त्यांच्यासारखे हातचे राखून वागले नाहीत. ब्राह्मणेत्तरांच्या व अस्पृश्यांच्या चळवळीबाबत त्यांनी नेमकी जाण प्रकट केली. त्या चळवळीतील ग्राह्यांश अचूक होण्याचे कौशल्य दाखवून तो लोकांपुढे उघड मांडण्याचे धैर्य अच्युतरावांनी दाखविले. [१०९] मराठी वृत्तपत्रांना जनसामान्यापर्यंत पोहचविण्याचे नवे वळण अच्युतरावांनी दिले. त्याचा तत्वचिंतक गंभीर बाब दूर केला. नागपूरच्या काँग्रेस अधिवेशनात कामगार आणि टाईपाच्या पेट्या ाह सर्व लवाजमा घेऊन ते गेले आणि 'संदेश' पत्र प्रसिद्ध केले. बातमीदाराची वाणवा असल्याच्या काळात विशेषप्रसंगी बातमीदार पाठवून सविस्तर वृत्तांत देण्याची पद्धत अच्युतरावांचीच होती. संदेशच्या ध्येयाविषयी त्यांनीच म्हटले आहे,

'संदेश हा स्वातंत्र्यभक्तांचा पेपर आहे. आकडेमोड्यांचा व नफे कमावणाऱ्यांचा नाही. कारण देशाच्या स्वातंत्र्यापुढे दुसरा कोणता नफा जास्ती आहे.'[११०] अर्थात मध्यमवर्गीय पांढरपेशा वर्गाकडून वृत्तपत्राला रस्त्यावरच्या माणसाच्या हाती दिले तेही अच्युतरावांनीच. आपल्या संदेशच्या १४ सप्टेंबर १९२० च्या अंकात त्यांनीच म्हटले आहे, संदेश हा मजुरांचा पेपर आहे. हा अस्पृश्यांचा कैवारी आहे, हा धर्मस्वातंत्र्याचा अभिमानी आहे, स्त्रियांच्या शिक्षणाच्या वादात ह्याने प्रबल मतविरोधाला न जुमानता स्त्रियांचीच बाजू घेतली. राजकीय स्वातंत्र्याच्या योगाने सामाजिक स्वातंत्र्य मिळविण्याचा तो प्रयत्न करील. [१११] मराठी वृत्तपत्रांना जनसामान्यांपर्यंत नेण्याचे काम अच्युतरावांनीच केले. संस्कृताचा अभ्यास करणारे अच्युतराव वर्तमानपत्राच्या भाषेविषयी म्हणतात, "सुशिक्षितांची भाषा लोकसमाजापासून फार लांब राहू लागलेली आहे. सुशिक्षितांची व्याख्याने, त्यांची वर्तमानपत्रे, त्यांची काव्ये व त्यांचे विचार लोकसमाजाच्या अंतःकरणात मुळीच नसतात ! ते कायम बोलतात हे लोकसमाजास मुळीच कळत नाही व लोकसमाजाच्या अंतःकरणात काय चालले आहे याची त्यांना दादही नसते. ज्या जगात सुशिक्षित वावरतात त्या जगात बहुजन समाज वावरत नाहीत व ज्या जगात बहुजन समाज वावरत नाहीत व ज्या जगात बहुजन समाज वावरतो त्या जगात सुशिक्षित लोक वावरत नाहीत. ह्याप्रमाणे सुशिक्षित लोक व बहुजन समाज यात तुटकपणा आलेला आहे. ते एकमेकांपासून अलग झालेले आहेत."[११२]

मराठी वृत्तपत्रांना नवे वळण देण्याचा, त्याच्या कक्षेत नवा वाचकवर्ग आणण्याचा आणि सकाळच्या चहाबरोबर वृत्तपत्र वाचण्याची आवड निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. तो यशस्वी झाला असेच आज दिसून येते.

## ३.१५ मराठी निबंधाचा विकास :

मराठीत 'निबंध वाड्मया' चा विकास करण्याचे श्रेय वृत्तपत्रांनाच द्यावे लागते. निबंधासारख्या वाड्मयप्रकाराचा जन्मच वृत्तपत्र आणि मासिकादी नियतकालिकांतून झायला. ज्ञानदानासाठी लिहिलेली बोधप्रद लिखाण व सुधारणेला चालना देण्याच्या उद्देशाने लिहिलेले जागृतीप्रधान लिखाण यामुळे निबंध वाड्मयाची वाढ होत गेली. इंग्रजी वाड्मयात निबंधचा जन्म होऊन ज्याप्रकारे तो विकसित झाला तसाच काहीसा प्रकार येथे झाला. मराठी निबंधाचे जन्मस्थानही छापखाना असून वृत्तपत्रे व मासिके यांनी त्याला जन्माला घालून त्याचे चांगले संगोपन केले. संपादकीय लेखनाप्रमाणे वाचकांच्या पत्रव्यवहारानेही महत्वाचे निबंधविषयक कार्य साधले. 'लोकहितवादींची शतपत्रे' हे त्याचे उत्कृष्ट उदाहरण होय. वृत्तपत्रातील लेखाला 'निबंध' म्हणून संबोधण्यात येऊ लागले. पत्रलेखनासारख्या प्रासंगिक व स्फुटगद्याचा आश्रय घेऊन लोकहितवादींनी मराठी निबंधात मोलाची भर घातली.[११३] मराठीत गंभीर विषयावरील निबंध लिहून त्यांनी (आगरकरांनी) [११४] एक नवा वाड्मयप्रकार रुढ करण्यास मदत केली. विचारांची तर्कशुद्ध मांडणी, सुबोधता व जीवनातील महत्त्वाच्या प्रश्नांची, उद्‌बोधक पण सामान्य वाचकास सहज समजेल अशी चर्चा, हे आगरकरांच्या निबंधलेखनाचे विशेष आहेत. वृत्तपत्राचे संपादक म्हणून लोकशिखणाचे जे ध्येय आगरकरांनी सतत डोळ्यासमोर ठेवले, यामधूनच या वाड्मयप्रकाराचा त्यांनी आश्रय केला, [११५] असे आपले निरीक्षण ग.प्र. प्रधानांनी नोंदविले आहे. तत्कालीन वृत्तापत्रातील लेखन ग्रंथनिविष्ट करताना त्यांना 'निबंध' म्हटल्याचे दिसून येते. 'केसरी' पत्रातील सुरुवातीच्या काळातील लेखांचे संग्रह प्रकाशित झाले असून त्यांना 'केसरीतील निवडक निबंध' असेच शीर्षक देण्यात आले आहे. भगवंतराव पाळेकरांनी 'जागृति' पत्राचा संसार मांडण्यापूर्वी वृत्तपत्रातून लिहिलेल्या लेखांचे पुस्तक १९१४ साली प्रसिद्ध केले. त्याला 'निवडक निबंध' असेच शीर्षक दिले आहे.

मराठी वृत्तपत्रातील लेखनाने भाषिक विकासाला पुष्कळच हातभार लावला. वृत्तपत्रांनी मराठी भाषेला प्रौढता व तेजस्विता प्राप्त करुन दिली. वृत्तपत्रातून धार्मिक, सामाजिक व राजकीय घडामोडींची माहिती देतना व तद्नुषंगाने वादविवाद करताना मराठी भाषेला नवे वळण मिळाले. विविध विषय मराठीतून प्रथम मांडण्याची कसरत करावी लागली. यामुळे भाषेची व्यापकता वाढली. वादातून ती जोमदार बनत गेली व पक्की कल्पना आपल्या भाषेतून मांडताना नवनवीन शब्द धुंडाळून व बनवून योजावे लागले. यामुळे नव्या शब्दांचा भरणा झाला व सामाजिक वाङ्मयाची वाढ झाली. याविषयी प्रा. न.र.फाटक म्हणतात, 'वृत्तपत्र नवा विषय लोकांच्या डोक्यात घालतात, मग त्याचा वाद सुरु होतो. वादाने भाषा आणि विचार याना सफाईदारपणा येतो, असा भाषाविचारांच्या सौष्ठवाचा आणि वृत्तपत्रांचा संबंध आहे.'[११६]

## ३.१६ वाचकांची पत्रे :

वाचकांच्या पत्रव्यवहाराला पहिल्या वृत्तापत्रापासून स्थान देण्यात येत असल्याचे दिसते. वाचकांच्या पत्रांना तत्कालीन संपादक उत्तरे देत असत व पत्रासोबत तीही प्रसिद्ध करीत असत. आपले गाऱ्हाणे वेशीवर टांगण्यास किंवा एखाद्या घटनेवर टीका करण्यास हे एक नवीनच साधन लोकांच्या हाती आले. त्याचा वापर मोठ्या उत्साहाने केलेला आढळतो. पत्रलेखकांना कोणताही विषय वर्ज्य नव्हता. पुनर्विवाहाचा प्रश्न, हिंदू धर्मविषयक पत्रे, स्त्रीयास विद्याभ्यास, मुंज मुलीची का नाही ? अशा अनेकविध विषयांवर वाचकांची पत्रे असत. त्याचा आवाका कधी-कधी निबंधरुप असे तर कधी ग्रंथपरीक्षणात्मक असे. मात्र पत्राबात एक गोष्ट सर्वच पत्रातून आढळते ती ही की, सर्वच पत्रे टोपणनावाने लिहिलेली आढळतात. यात अनेक विचित्र नावे घेतलेली असत. 'हिंदुचा मित्र', 'मनुष्याचा मित्र', 'एक स्पष्टवक्ता', 'खोटे करु नये म्हणून इच्छिणारा', 'कित्येक हिंदू चाली बऱ्या व्हाव्या याविषयी एक उत्कंठित', 'रानवासी', 'मताभिमानी', अशी नावे पत्राखाली आढळतात. काही नावे मोठी चमत्कारिक व गमतीदार

असत. लोककल्याणेच्छु पत्रात 'गोल्या घुबड' या सहीची पत्रे येत असत. ज्ञानप्रकाश पत्रात 'वेताळ' व 'पिशाच्च' या सहीची पत्रे येत असत. [११७] केसरीतही 'बिचारा', 'एक बिचारा कणवळ', 'न' अशा टोपणनावानी पत्रलेखन केलेले आढळते. मात्र काही ठिकाणी पत्रलेखकांची स्पष्ट ओळख बिचारा-हरिभाऊ आपटे, न - सदाशिव परचुरे पुढील अभ्यासकांनी दिली आहे. [११८] सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यविषयक प्रश्नांची चर्चा वाचकांच्या पत्रव्यवहारातून झाल्याचे दिसून येते. पुस्तकांवर अभिप्राय देण्याची, ग्रंथपरीक्षणे - परिचय देण्याची प्रथाही मराठी वृत्तपत्रामध्ये प्रथमपासूनच आढळते.

## ३.१७ जाहिराती :

जाहिरात हे वृत्तपत्राचे 'मायपोट' असल्याचे म्हटले जाते. मराठी वृत्तपत्रात प्रथमपासून जाहिराती सापडतात. मराठी पत्रे सुरु होण्यापूर्वी मुंबईतील इंग्रजी पत्रात मराठी जाहिराती सापडतात. मराठीतील पहिली जाहिरात मुंबईतील 'कुरियर' पत्रात १७ जुलै १८०२ रोजी प्रसिद्ध झाली होती व ती मोडी लिपीत होती. बाळबोध लिपीतील पहिली मराठी जाहिरात 'कुरियर' पत्रातच १८२३ मध्ये प्रसिद्ध झाली होती. [११९] तत्कालीन वृत्तपत्रातील जाहिरातील 'टेक्स्ट' ला महत्व असल्याचे दिसुन येते. नंतरच्या काळात हळूहळू चित्रांचा वापर करुन जाहिरात आकर्षक व कलात्मक करण्याकडे कल सुरु झाल्याचे दिसुन येते. सिंगर सोईंग कंपनीची शिवणकामाची यंत्रे प्रथम आली तेव्हा त्याविषयी पुण्याच्या ज्ञानप्रकाशात एक सचित्र जाहिरात प्रसिद्ध झाली होती. चित्रातला शिंपी पागोटे, अंगरखा, धोतर अशा त्यावेळच्या पोषाखात होता. होलवेच्या गोळ्या, तसेच नाटकाच्या जाहिरातीही प्रसिद्ध होत असत. जाहिरातीतून समाजजीवनावरही प्रकाश पडतो. छापण्याच्या शाईत निषिद्ध चरबी वापरीत असल्याच्या समजुतीमुळे छापलेले धार्मिक ग्रंथ अशुद्ध समजले जात. या समजुतीमुळे

‘सोवळ्याने वाचण्याकरिता’ श्रीगुरुचरित्राची पोथी तयार केल्याची जाहिरात ठाण्याच्या अरुणोदय पत्रात आली होती.

**श्रीगुरुचरित्र**

**सोवळ्याने वाचण्याकरिता**

हे पुस्तक चांगले शुद्ध करुन शिळाप्रेसावर छापण्याचे काम सुरु केले आहे. कागद जाडा, अक्षर सुवाच्च. ऑक्टोबर १८६६ अखेर पैसा पाठविणाऱ्यास किंमत ४४४ व बंगीखर्च ४१२ एकूण ५ रुपयास मिळेल. २० प्रति घेणारास बंगीखर्च पडणार नाही. किंमतीबद्दल वर्तवळ्यासुद्धा टिकिटे पुणे ज्ञानप्रकाशचे म्यानेजर यांच्या नावे पाठवावी, म्हणजे पुस्तक तयार होताच रवाना केले जाईल.

वृत्तपत्रांमध्ये ‘वर पाहिजे’, ‘वधू पाहिजे’ किंवा ‘हरवले’, ‘विकणे’ अशा जाहिराती आजच येतात असे नव्हे. १८४० मध्ये ‘मुंबई अखबार’ मध्ये कुत्री हरवल्याची जाहिरात असून जाहिरातकर्त्याने ही कुत्री आणून देणारास ५० रुपयाचे बक्षीस देण्याचे जाहिरातीत म्हटले आहे. तसेच भिवर्थडी जातीचा घोडा ‘विकावयाचा’ अशी जाहिरात ‘दर्पण’ पत्राच्या १७ फेब्रुवारी १८३२ च्या पहिल्याच वर्षाच्या अंकात दिसून येते. तर ‘एक चांगला’ संस्कृत जाणणारा पंडित ‘पाहिजे’ अशीही जाहिरात प्रारंभीच्या वृत्तपत्रातच प्रसिद्ध झाली आहे. पुनर्विवाहावरुन सनातन आणि सुधारकात रण चालल्याच्या काळात ठाण्याच्या अरुणोदय पत्रात रविवार ता. २३ जाने. १८७०, पुस्तक -५, अंक-४ मध्ये एक बालविधवा पुनर्विवाहास तयार असल्याची जाहिरात आली होती. ती पुढीलप्रमाणे -

“एक चित्तपावन जातीची सुमारे १३ वर्षाची बालविधवा आपल्या पालकांच्या संमतीने पुनर्विवाहास तयार आहे. इचा पूर्वपति ८ व्या वर्षी मृत झाला असून इला अद्यापि रजोदर्शन झाले नाही. वर कुलीन, साधारण विद्वान, नितिमान आणि २५ वर्षापेक्षा कमी किंवा त्या सुमाराने वयाचा असावा. वधूच्या माहेरचे गोत्र शांडिल्य आहे. याविषयी ज्यास पत्रे वगैरे पाठविणे असतील ती ठाणे येथे अरुणोदयचे एडिटर यांच्या नावे पाठवावी. विशेष माहिती त्यास समक्ष भेटले असता ते कळवतील”[१२०]

सरकारी आगगाडीचा रस्ता माल व उतारु पाठविण्याच्या व्यवहारासाठी सुरु झाल्याची जाहिरात वृत्तपत्रात दिसते. तशीच ‘प्रवास कमी करा’ आणि धोक्याचा प्रवास तर मुळीच करु नका अशीही रेल्वेची सचित्र जाहिरात नंतरच्या काळातील वृत्तपत्रात पहायला मिळते. ‘ध्यानात असू द्या की, तुमच्या प्रवासापेक्षा सर्व देशभर अन्न, वस्त्र व जळण इत्यादि वस्तूंचा पुरवठा करण्याची महत्वाची कामगिरी रेल्वेंना बजवावयाची आहे.’ असा रेल्वेच्या कामाचा अग्रक्रमाचा उल्लेख जाहिरातीत दिला आहे. ‘केसरी’ पत्राला वर्गणीदारांबरोबरच जाहिरातीचे उत्पन्नाचा आधार होता हेही केसरीच्या ऊर्जितावस्थेचे कारण दिसून येते.

### ३.१८ संस्थाने, संस्थानिक व मराठी पत्रे :

मराठी वृत्तपत्रांच्या कामगिरीत मराठी व मराठा संस्थानांच्या बाबतीत विशेष आस्था मराठी वृत्तपत्रांमध्ये दिसून येते. बडोद्याचे दुर्देवी महाराज मल्हारराव गायकवाड यांचे प्रकरण मराठी वृत्तपत्रांतून चांगलेच गाजले. मल्हारराव व इंग्रज रेसिडेंट यांचा बेबनाव बरेच दिवस धुमसत होता. शेवटी मल्हाररांवावर विषप्रयोगाचा आरोप करुन त्यांना पदच्युत करण्यात आले. दिवाण दादाभाई नौरोजी यांनी समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न केला पण तो यशस्वी झाला नाही. पदच्युत झाल्यावर मल्हाररावांना अकिंचन दशा प्राप्त झाली. त्याचा फार मोठा बोभाटा

होऊन महाराष्ट्रात खळबळ उडाली. पुण्याचे सार्वजनिक काका गणेश वासुदेव जोशी यांनी दुर्देवी राजाला एक लक्ष रुपयाचे आश्वासन पाठवून दिले. पुण्याच्या सार्वजनिक सभेने पुढाकार घेऊन मल्हाररावांच्या वतीने व्हाईसरॉयकडे एक विनंती अर्ज पाठविला. हा अर्ज न्या. रानडे यांनी तयार केला होता. [१२१] याचा महाराष्ट्रात प्रतिकूल परिणाम होऊन मराठी वृत्तपत्रात टीका येऊ लागली होती. मराठा संस्थानिकांनी वृत्तपत्रांच्या वाढीला मदतच केली आहे. १८९२ मध्ये बडोद्यात 'श्री सयाजी विजय' हे वृत्तपत्र इंग्रजी-मराठी-गुजराथी भाषेत श्री. यंदेशेटजींनी जेव्हा सुरु केले तेव्हा त्यांच्या वृत्तपत्राच्या मुद्रणालयाचे उद्घाटन स्वतः श्रीमंतांनी केले. शिक्षण व साक्षरता प्रसार, ग्रंथालयाच्या चळवळीला संस्थानात स्तुत्य उपक्रम आणि ग्रंथोत्तेजनास श्रीमंताची सक्रिय सहानुभूती वगैरे अनेक प्रकारच्या उत्तेजनाचे बडोद्यातील 'श्री सयाजी युग' ह्या गौरवास्पद कालाचा उल्लेख केला जातो. [१२२] बडोद्याचे वेदोक्त प्रकरण त्या काळात बरेच गाजले. पण कोल्हापुरातील 'वेदोक्त प्रकरणा' सारखे गंभीर व ज्यालाग्राही वळण बडोद्याच्या 'वेदोक्त प्रकरणाने' घेतले नाही. बडोदानरेशांनी हे प्रकरण संयमाने व कुशलतेने हाताळले. ब्राह्मणेत्तर चळवळीचे 'बडोदा स्कूल' हे वेगळे स्कूल होते. ठाण्याच्या 'अरुणोदय' पत्राने समाजसुधारोचा पुरस्कार कधी केला नाही. पण बडोदा वेदोक्त प्रकरणी अरुणोदय पत्राची भूमिका पुष्कळच समतोल असल्याचे त्याच्या १ नोव्हेंबर १८९६ च्या अंकावरुन दिसून येते.

### ३.१९ समकालीन पत्रकारितेचे स्वरुप विशेष :

बंगालपाठोपाठ मराठीत पत्रकारितेच्या पर्वाला प्रारंभ झाला. इंग्रजांची महाराष्ट्रात सत्ता स्थापन झाल्यावर जवळजवळ दीड दशक मराठी वृत्तपत्र सुरु होण्यासाठी लागले. नवे शिक्षण, नवे विाान आणि तंत्राचा परिचय झाल्यावर, छापखाने सुरु झाल्यावर वृत्तपत्र मराठीत सुरु झाली. १८३२ मध्ये बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' पत्र सुरु केले. नवी विद्या मिळालेल्या विद्वानांनी वृत्तपत्रे सुरु केली. वृत्तपत्रांचे स्वरुप प्रथम ज्ञानप्रसाराचे व पुढे ते हळूहळू राजकीय व

सामाजिक प्रश्नांकडे वळले. विधवाविवाह, स्त्रीशिक्षण, इंग्रजी राजवटीचे व शिक्षणाचे फायदे-तोटे यांची मराठी वृत्तपत्रकार गांभीर्याने व हिरीरीने चर्चा करीत असत.

संपादकांना व लेखकांना मुशाहिरा देण्याचे सामर्थ्य तेव्हाच्या कोणत्याही वृत्तपत्राच्या चालकापाशी नव्हते. लेखनकार्याने द्रवय संपादावे अशी आकांक्षा लेखकवर्गातही नव्हती. आपले ज्ञान दुसऱ्यांना निःस्वार्थ बुद्धिने पुरवावे, या हेतुने त्या काळात नियतकालिकांची सेवा लेखकवर्ग करीत होता. वृत्तपत्रे हा आतबट्ट्याचा व्यवहार खरा; पण ज्यांना देशकल्याणाची आस्था असेल त्यांच्या दृष्टीने तो अपरिहार्य समजला गेला व पदराला खार लावून घेऊन सुरुवातीस वृत्तपत्रांचा कारभार लोकांनी सुरु केला. वृत्तपत्राच्याद्वारे द्रव्यलाभ होण्याची आशा नसली तरी वृत्तपत्रे निघण्याला खळ पडला नाही. [१२३] असे आपले निरीक्षण प्रा. न.र. फाटक यांनी नोंदविले आहे.

मुंबई विद्यापीठाच्या पहिल्या पदवीधरांनी वृत्तपत्र माध्यमाचा जनप्रबोधनासाठी व ज्ञानदानासाठी उपयोग केला. परशुरामशास्त्री, न्या. म.गो.रानडे, न्या. तेलंग, न्या. चंदावरकर यांनी इंदुप्रकाशसह अन्य वृत्तपत्रातून लेखन केलेले आढळते.

अनेक वृत्तपत्रे व मासिके स्वधर्माची बाजू हिरीरीने लढवण्यासाठी निघाली व प्रत्येकाने आपापली कामगिरी मोठ्या निष्ठेने पार पाडली. पण ही नियतकालिके प्रामुख्याने पांढरपेशा वरिष्ठ वर्गाच्या व त्यातही ब्राह्मणांच्या हाती होती. या पार्श्वभूमीवर ख्रिस्ती मतांचा पुरस्कार करण्यासाठी अहमदनगरहून अमेरिकन मिशनने 'ज्ञानोदय' पत्र सुरु करुन दीर्घकाळ चालविले, हे लक्षात घ्यावे लागते.

जनतेच्या म्हणजे मूठभर सुशिक्षितांच्या आकांक्षाचे-विचारांचे प्रतिबिंब वृत्तपत्रात पडत होते. बदललेल्या परिस्थितीत सरकार व जनता यांचे परस्पर संबंध कशा प्रकारचे असावे, राजकारणात हिंदी जनतेला अधिकाधिक वाव मिळावा, सरकारी कारभार जनताभिमुख होणे

इष्ट इत्यादी विचार वृत्तपत्रीय लिखाणात व्यक्त होत होते. राजकारण मुठभर सुशिक्षितांपुरते मर्यादित होते. बहुसंख्य जनता तर राजकारणाविषयी पूर्ण उदासीनच होती. किंबहुना राजकारणाची जाणीव सामान्य जनतेत नव्हती. हिंदुस्थानातील वृत्तपत्रे देशातील राजकारणाचाच प्रामुख्याने विचार करतात. अशी तक्रार कित्येक पाश्चात्य पंडितही करताना आढळतात.[१२४]

तत्कालीन बहुसंख्य वृत्तपत्रे ही मतपत्रे होती. बातमीदार नेमून बातम्या मिळविण्याऐवजी वृत्तसार देण्याकडे वृत्तपत्रांचा कल होता. बहुतेक वर्तमानसार इंग्रजी वृत्तपत्रांतून घेतलेले असे. तसेच केसरी-मराठापूर्वीची पत्रे इंग्रजी-मराठी अशी द्विभाषिक असत. बडोदा संस्थानात इंग्रजी-मराठी गुजराथी ; तसेच बेळगाव-कारवार या भागात इंग्रजी-मराठी-कानडी अशा त्रिभाषांतूनही प्रसिद्ध होत असल्याचे आढळते. ब्राह्मण भोजने व दक्षता हेही त्या काळचे चर्चेचे व बातमीचे विषय आढळतात. ता. १ डिसेंबर १८६२ च्या 'ज्ञानप्रकाशा'त माळव्यातील पवारांच्या राजधानीतून श्रीमंत शिंदे सरकारने ७०० ब्राह्मणांना भोजन आणि दर आसामीस १ रुपया दक्षणा दिल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. दक्षणा पत्रावर न देता तांब्यात टाकण्याची युक्ती मुनिमाने केल्याने ब्रह्मवृंदास खुषी झाली असल्याचा बातमीत उल्लेख आहे. [१२५] ब्राह्मणी परंपरा व संस्कृती संवर्धनासाठी प्रयत्न होत असल्याचे वृत्तपत्रातील मजकुरावरुन दिसून येते. 'लोकस्थिती, धर्मरीती आणि उपयोगी फेरफार घडवून आणण्यासाठी' सुरु झालेली पत्रकारिता 'प्रभाकर' पासून सामाजिक विषयांचा ऊहापोह करु लागली. तिने सरकारच्या चुका दाखवून जनहितविरोधी गोष्टी सडेतोडपणे मांडल्या. पण मर्यादित सामाजिक सुधारणा करु पाहणाऱ्या नवशिक्षितांना, सुधारकी प्रवाहाला आळा घालण्याचे कार्य विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी निबंधमालेतून पार पाडले. हिंदुस्थानी जनतेच्या मनातील न्यूनगंड झाडून टाकून स्वभाषा, स्वधर्म, स्वसंस्कृती वगैरेबद्दल गर्वाभिमान निर्माण करण्याच्या हेतूने निबंधमालेने भूतकालाचे अतिगौरवीकरण जोरदारपणे केले. [१२६] तसेच अतीत गौरवाच्या आहारी जाऊन समकालीन

लौकिक घडामोडींचे विवेचन त्यांनी कटाक्षाने टाळले होते. [१२७] मालाकारांनी सत्यशोधक समाज व जोतीराव फुले यांच्यावर केलेली टीका अवास्तव, अयथार्थ होती.

लोकहितवादी, आगरकर, न्या. रानडे यांनी सामाजिक सुधारणेच्या विचारप्रचारासाठी 'वृत्तपत्र' हेच माध्यम वापरले. सुधारणावादाचा आवाका स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, विधवाविवाह, परदेशगमन, स्त्रियांचे हक्क यापलीकडे गेला नाही. खरे म्हणजे विशेषत: ब्राह्मणवर्गाच्या सुधारणेपलीकडे त्यांचा आवाका कधी गेलाच नाही. त्या तिन्ही सुधारकांच्या अनुयायांमध्ये परंपरावादी सुधारक, 'व्युत्पत्ती सुधारक', थंडे सुधारक, मंद सुधारक, गरम सुधारक व वागते सुधारक होते. कर्ते असे सुधारक मात्र थोडेच होते. बालविवाह, विधवाविवाह, स्त्रीशिक्षण, सावळेओवळे ह्याविषयी मतप्रचार करुन विधवेला केशवपनापासून वाचवावे, वसन नि भोजन याबाबतीत तिला संन्याशाशी स्पर्धा करावी लागू नये, अशी ते प्रार्थना करीत असत. [१२८] सुधारणेच्या बाजूने आणि विरोधात सुरु असलेल्या या पत्रकारितेचे संपादक, लेखक बव्हंशी वाचकही इंग्रजी विद्येने जागृत झालेले शहरी, मध्यमवर्गीय स्त्रीपुरुष होते. स्वाभाविकच याच वर्गाच्या प्रश्नांचे प्रतिबिंब या सर्व वर्तमानपत्रांत आढळते. १८८१ मध्ये अस्तित्वात आलेल्या केसरी व मराठा वृत्तपत्रांतूनही हीच परंपरा अधिक दृढमूल झालेली दिसून येते. जोतीरावांच्या कार्याविषयी या पत्रकारितेने कमालीचे औदासिन्य किंवा आक्रमकता व कुचेष्टा यांचे संमिश्रण असलेले धोरण ठेवले होते. [१२९] जोतीराव फुल्यांसारख्या त्यांच्या समकालीन नेत्याने 'स्वराज्य कोणासाठी व कशासाठी' असे महत्वाचे प्रश्न आपल्या रांगड्या व खडखडीत शैलीत सतत विचारले होते. शतकानुशतके ज्ञानाला, सत्तेला व संपत्तीला पारखे झालेल्या लाखे पददलितांना स्वराज्यात सत्तेचा वाटा मिळणार नसेल तर स्वराज्य म्हणजे ब्राह्मणासारख्या वरिष्ठ जातीची गुलामगिरी पत्करणे एवढाच त्याचा अर्थ होईल, असे जोतीराव बजावत होते व बहुजन समाजाला वाटणारी भीती, त्यांच्या आकांक्षा व गाऱ्हाणे यांना वाचा फोडीत होते. पण

मिशनऱ्यांच्या नादी लागून स्वराज्याच्या प्रयत्नात विघ्न आणणारा एक ब्राह्मणद्वेष्टा माणूस यापलीकडे केसरीने; एवढेच नव्हे तर आगरकरांसारख्या सुधारक समकालीनांनीही जोतीरावांचे मूल्यमापन केलेले दिसत नाही. [१३०] केसरीने मागे जोतीरावांचा मृत्यूलेख लिहिला नव्हता. [१३१] केसरीप्रमाणेच सुधारकानेही जोतीरावांच्या मृत्यूची दखल घेतलेली नाही, ही वस्तुस्थिती डॉ. य.दि. फडके यांनी मांडली आहे. [१३२]

'आधी सामाजिक की राजकीय' हा वाद आगरकर केसरीतून बाहेर पडल्यावर आणि त्यांनी १५ ऑक्टोबर १८८८ ला 'सुधारक' पत्र सुरु केल्यावर वृत्तपत्राच्या माध्यमातून खेळला गेला. या वादाची पातळी खालावली. संमतीवयाच्या बिलाच्या प्रश्नावलीतील संघर्षात टिळक-आगरकरांनी परस्परांवर द्वेषाने आरोप केले. पंडिता रमाबाईचे शारदा सदन, केसरीची न्या. रानड्यांवर टीका, टिळक ख्रिस्ती मेसनच्या हातचा भात व बिस्किटे खातात अशी आगरकरांची टीका यात टीकेची पातळी खालावली नाही. पण पुढे 'टिळकांच्या मेंदूत बिघाड झाला आहे' असे आगरकर म्हणत होते, तर 'गंजीवरला कुत्रा', 'माळावरचा महारोगी' अशा शेलक्या शब्दांचा टिळक आगरकरांवर वर्षाव करीत होते. [१३३] संमतीवयाच्या बिलामुळे "आमच्या रुढीस व शस्त्रास धक्का बसतो" असे सनातन्यांचे प्रतिनिधी टिळक केसरीतून लिहीत होते. लग्नाचे वय वाढवावे अशा उद्देशाने नामदार शास्त्री यांनी १९१५ साली पुढे आणलेल्या विधेयकास त्यांनी विरोध केला. विठ्ठलभाई पटेल यांनी १९१८ साली आंतरजातीय विवाह कायदेशीर ठरविण्यासाठी जे विधेयक आणले, त्यालाही त्यांनी विरोध केला. मुलींना सक्तीचे प्राथमिक शिक्षण द्यावे असा पुणे नगरपालिकेत १९२० साली फेब्रुवारी महिन्यामध्ये ठराव आला असता त्या ठरावाला टिळकांनी एका सार्वजनिक सभेत विरोध केला. १९ मार्च १९१८ रोजी कर्मवीर शिंदे ह्यांनी भरविलेल्या अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषदेत त्यांनी भाषण केले. हे भाषण आटोपल्यावर परिषदेस उपस्थित असलेल्या अडीचशे नेत्यांनी एक जाहीरनामा प्रसिद्ध

केला. त्या जाहीरनाम्यावर सही करणाऱ्या पुढाऱ्याने वैयक्तिक जीवनात अस्पृश्यता पाळणार नाही, अशी प्रतिज्ञा करावयाची होती. त्या जाहीरनाम्यावर सही करण्यास टिळकांनी नकार दिला. [१३४] आपण केसरीकार म्हणून आलो नसून टिळक म्हणून सहभागी झाल्याचे टिळकांचे म्हणणे होते. या परिषदेचे वृत्त 'केसरी' ने प्रसिद्ध केले नाही. राजकीय बाबतीत प्रगतिशील आणि प्रभावी असलेले टिळक, सामाजिक प्रश्नांबात शेवटपर्यंत पुनरुज्जीवनवादी आणि अपरिवर्तनशील राहिले. [१३५] टिळकांच्या याच ध्वनीचा प्रतिध्वनी 'केसरी' पत्रातून निघत राहिला. केसरीच्या परंपरेत शिवरामपंत परांजपे यांचा 'काळ' व भोपटकरांचा 'भाला' याचा विचार केला तरी टिळकपसंप्रदायी वृत्तपत्रे राजकारणात क्रांतिकारक; पण समाजकरणात सुधारणाविरोधी सनातनवृत्तीची होती, असे त्यांचे वैशिष्ट्ये दिसून येते. टिळकसंप्रदायी पत्रांना आणि त्यांच्या कर्त्यांना टिळकांप्रमाणेच राजद्रोहाच्या खटल्याचा सामोरे जावे जागले आणि शिक्षा भोगाव्या लागल्या हेही त्यांचे वैशिष्ट्य दिसून येते. तसेच या काळातील पत्रांच्या संपादकीय लेखनाचे स्वरुप गंभीर वळणाच्या निबंधप्रबंधाचे असल्याचे आढळते.

तत्कालीन ब्राह्मणी, पांढरपेशा, मध्यमवर्गीय, सुधारणावाद्यांशी संस्कृतिसंवर्धक केसरीने जशी परंपरावादी, सनातनी भूमिका घेतली तशीच भूमिका जहालपणे शहू महाराजांशी झालेल्या संघर्षात घेतली. कोल्हापूरच्या वेदोक्त प्रकरणात वहिवाट व रुढी यांच्या आधारावर कोल्हापूरचे महाराज व एकंदर मराठे यांच्या वेदोक्त धार्मिक विधी करण्याच्या मागणीला टिळकांनी विरोध केला. २२ ऑक्टोबर १९०१ च्या 'केसरी' त टिळकांनी जो अग्रलेख लिहिला त्यात म्हटले होते की, ''साताराच्या घराण्यात जी परंपरा आहे तीवरुन पाहता भोसले कुळातील गृह्यसंस्कार पुराणोक्त होत, असे दिसून येते. असे जर आहे तर श्री. शिवाजी महाराजांपेक्षा ज्यांची जातकुळी श्रेष्ठ नाही त्यांनी वेदोक्ताचे खूळ माजवून राज्यातील लोकांच्या शांततेचा विनाकारण भंग करावा हे गैरशिस्त होय. वैदिक मंत्रांनी संस्कार झाले म्हणजे मराठे व ब्राह्मण एकजातीचे होतील

अशी जर कोणाची कल्पना असेल तर तीही निर्मूल आहे. ब्राह्मण जातीतील स्त्रियास वेदोक्त मंत्र म्हणण्याचा अधिकार नसताही त्या जातीने ब्राह्मण आहेत आणि मराठे लोकांनी वेदोक्त मंत्र म्हटले तरी ते मराठेच राहतील, हे लक्षात ठेवले पाहिजे.'' टिळकांनी सनातन्यांचा बुरसट पक्ष घेतल्याने ब्राह्मणेत्तरांच्या मनात त्यामुळे कडवटपणा निर्माण होऊन सामाजिक ऐक्याची फार मोठी हानी झाली. [१३६] कुलकर्णी वतन नष्ट केल्यावर 'केसरी' ने आकाशपाताळ एक केले. [१३७] 'केसरी' कुलकर्ण्यांच्या बाजूने उभा राहिला. कालज्ञान हे जसे शेवटच्या पेशव्यांना नीट झाले नाही तसे पुण्यातील चिपळूणकरीय विचारसरणीच्या नेत्यांना ते कधीच झाले नाही. [१३८] समाजसुधारणेच्या उद्देशाने आलेल्या सर्व विधेयकांना टिळकांनी विरोध केला; पण छत्रपतींनी सर्व विधेयकांना पाठिंबा दिला. महाराजांनी मागासलेल्या जातींना पन्नास टक्के नोकऱ्या राखून ठेवण्याचा क्रांतिकारक ठराव जाहीर केला. तेव्हा ब्राह्मणीपत्रांनी त्याविरुद्ध शंख फुंकला. कोल्हापूरचे 'समर्थ' पत्र त्यात आघाडीवर होते. शेतकऱ्याच्या कर्जबाजारीपणाला आळा घालण्याच्या उद्देशाने जमीन विकण्याचा त्याचा हक्कच काढून घेणारे एक विधेयक १९०१ साली कायदे कौन्सिलपुढे मांडण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आले. त्याचा पहिला मसुदा प्रसिद्ध होताच 'केसरी' ने २५ मे १९०१ रोजी एक स्फुट लिहून टीका केली व पुढे ऑक्टोबरपर्यंत सातत्याने या प्रश्नांचा पाठपुरावा केला. पण शेतकऱ्यांच्या दृष्टीने सरकारची भूमिकाच रास्त होती असे म्हटले पाहिजे. [१३९] शेतकऱ्यांच्या उन्नतीसंबंधी टिळकांनी लेख लिहिले. परंतु त्यांच्या परिस्थितीत सुधारणा व्हावी म्हणून जेव्हा जेव्हा ब्रिटिश सरकार प्रयत्न करी तेव्हा तेव्हा टिळक, गोखले, फिरोजशहा मेथा हे श्रीमंतांची नि जमीनदारांची बाजू घेऊन सरकारशी भांडत असत. टिळक शेतकऱ्यांची बाजू घेत तेव्हा त्यांच्या लेखांचा नि भाषणाचा सूर असा असे की, शेतकऱ्यांच्या कर्जबाजारी अवस्थेला केवळ सरकार कारणीभूत आहे. सावकार व जमीनदार हे त्या विपन्नावस्थेला किती जबाबदार आहेत हे ते कधीच स्पष्टपणे व निर्भयपणे सांगत नसत.

सावकार, जमीनदार व शेतकरी ह्यांना ब्रिटिश राजवटीविरुद्ध उठवणे हेच त्यांचे प्रामुख्याने उद्दिष्ट असे. 'शेतकऱ्यांनो वा सावकारांनो सावध रहा', 'सावकार मेला आणि कुणबीही मेला', 'खोतीच्या हक्कावर घाला' आणि 'कुलकर्ण्यांच्या हक्कावर गदा' अशी ते ओरड करीत. महात्मा जोतीराव आणि त्यांचे सहकारी लोखंडे नि भालेकर ह्यांनी शेतकऱ्यांच्या विपन्नावस्थेविषयी ओरड केली होती, गाऱ्हाणी मांडली होती. परंतु त्याकाळी ही गाऱ्हाणी टिळक, गोखले आदि नेत्यांना नीट समजली नसावीत, किंवा आपले वतनदार, सावकार नि जमीनदार अनुयायी नाखूष होतील या भीतीने म्हणा, त्यांनी लिहिलेच तर गुळमुळीत लिहून मोकळे होत. [१४०] केसरी परंपरेतील पत्रांकडे शेतकरी प्रश्नांविषयी मूलभूत दृष्टी नव्हती. एका वाचकाने त्या काळातील वृत्तपत्रासंबंधी आपले मत मार्च १८७२ मध्ये 'ज्ञानप्रकाश' मध्ये नोंदवल्याचे आढळते. त्याने म्हटले आहे, "शेतकरीवर्गांना उपयुक्त अशी माहिती सर्वत्रच कमी." [१४१] समकालीन पत्रकारिता शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंबंधी उदासीन होती असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. दलितांच्या प्रश्नाबाबत सत्यशोधक समाज महात्मा जोतीराव फुल्यांच्या नेतृत्वाखाली नवजागरण करीत होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व १९२० मध्येच पुढे येत होते. हजारो वर्षांच्या मुक्या मनांना जिवंत करण्याच्या गरजेपोटी ३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक' या पाक्षिकाचा जन्म झाला. [१४२] छत्रपती शाहु महाराजांची आर्थिक मदत मिळाल्याने 'मूकनायक' पत्राला मूर्तरुप आले ; पण लोकमान्य टिळकांच्या हयातीतच 'मूकनायक' ची जाहिरात केसरीमध्ये लावण्यास नकार देण्यात आला होता. [१४३] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केसरीच्या मतांचा उल्लेख 'वांझेची पुत्रेच्छा' असा केला आहे. पुणे शहरातील सनातन्यांबद्दल आपला अभिप्राय सांगताना डॉ. आंबेडकर म्हणतात, 'पुणे म्हणजे एक बदमाषांचा अड्डा आणि लबाडांची पेठ आहे.' केसरीच्या भाषेस 'धर्मलंडाची भाषा' असे

म्हटले आहे.[१४४] केसरी परंपरेची पत्रकारिता ही धुरिणत्व अभिजन पत्रकारिता होती ; पण तिच्या मर्यादांमुळे ही पत्रकारिता पांढरपेशा मध्यमवर्गीय ब्राह्मणी चौकटीतच अडकून पडली. तिला राष्ट्रवादी प्रेरित पत्रकारिता म्हटले तरी ती अभिजन वर्गाकडून बहुजनवर्गापर्यंत पोहचू शकली नाही. बहुजनकेंद्री ब्राह्मणेत्तार पत्रकारितेचा समांतर; पण जोरकस प्रवाह याच काळात गतिमान झाला. या ब्राह्मणेत्तर पत्रकारितेने धुरिणत्व अभिजन पत्रकारितेला आव्हान देत बहुजन दलित प्रश्नांची, बहुजनांच्या राष्ट्रवादाची मांडणी केली.

**संदर्भ सुची :**


१. रामचंद्र गोविंद कानडे, मराठी नियतकालिकांचा इतिहास, कर्नाटक पब्लिशिंग हाऊस, मुंबई - २,१९३८, पृ. १००

२. न.चिं.केळकर, वृत्तपत्र मीमांसा, नीलकंठ प्रकाशन, पुणे १९६५, पृ.३३.

३. लेले रा.के., मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८४, पृ. ११२

४. कित्ता, पृ. १६

५. बेडेकर दि.के., भा.शं. भगणे (संपादक) भारतीय प्रबोधन, समाज प्रबोधन संस्था, पुणे, प्रा.आ. १९७३, पृ. १२४

६. पूर्वोक्त, लेले, पृ. ०६

७. पूर्वोक्त, लेले, पृ. ३२

८. वि.कृ.जोशी, वृत्तपत्रांचा इतिहास, युगवाणी प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९५१, पृ. १५

९. पूर्वोक्त, लेले, पृ. ४०

१०. पूर्वोक्त, केळकर, प्रास्ताविक, पृ. ४

११. कित्ता, पृ. १८

१२. कित्ता, पृ. १९

१३. गंगाधर पानतावणे, पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती १९९६, पृ. १४

१४. पूर्वोक्त, जोशी वि.कृ., पृ. ३३५

१५. पूर्वोक्त, बेडेकर दि.के. व भा.शं.भणगे (संपादक) भारतीय प्रबोधन, पुणे १९७३, पृ. १०३

१६. दिक्षित राजा, इतिहास, समाजविचार आणि केशवसुत, लोकवाड्मय गृह, मुंबई १९९३, पृ. ५१.

१७. कित्ता, पृ. ५२

१८. जोशी रा.भी., महाराष्ट्रातील प्रबोधन पर्व संपले आहे काय ? समाविष्ट, भारतीय प्रबोधन, संपादक बेडेकर, भणगे, पुणे १९७, पृ. १२५.

१९. पूर्वोक्त, जोशी वि.कृ., वृत्तपत्रांचा इतिहास (पृ. १७०-७१)

२०. कित्ता, पृ. १७१.

२१. जोग रा.श्री. (संपादक), मराठी वाड्मयाचा इतिहास, खंड चौथा, पुणे, १९७३.

२२. पूर्वोक्त, जोशी वि.कृ., पृ. २७४

२३. कित्ता, पृ. २७५

२४. जोशी ना. वि., पुणे शहराचे वर्णन, संपादक डॉ. शांताराम गजानन महाजन, प्रथमावृत्ती, २००२, पृ. ६

२५. पहा, अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशकाळात मराठी वृत्तपत्रांचा लढा. न्या. नरेंद्र चपळगावकर, प्रकाशक - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, चर्चासत्रातील निबंध.

२६. पूर्वोक्त, कानडे, नियतकालिकांचा इतिहास, पृ. ३४ (यापुढे ‘मराठी नियतकालिकांचा इतिहास’या पुस्तकाचा उल्लेख ‘नियतकालिकांचा इतिहास’ असा केला आहे.)

२७. फाटक न.र., प्रस्तावना, वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. १०

२८. पूर्वोक्त, जोशी वि.कृ., पृ. २८४.

२९. पूर्वोक्त, लेले, मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. ६२

३०. कित्ता, पृ. ५६

३१. उ.नि.जोशी, वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. ३१९

३२. पहा, प्रस्तावना, न.र.फाटक, नियतकालिकांचा इतिहास, पृ. २, ३

३३. पूर्वोक्त, लेले, पृ. ६७

३४. कित्ता, पृ. ३८, ३९

३५. उ.नि.जोशी, वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. ३२०

३६. पूर्वोक्त, लेले, पृ. ६१

३७. इंग्रजी-मराठीची सरमिसळ याला प्रा. न.र. फाटक 'गंगाजमनी थाट' असा शब्दप्रयोग करतात. तत्कालीन मराठी वृत्तपत्रे गंगाजमनी थाटाने चालत. केसरी मराठाने इंग्रजी मराठीचे मिश्रण करण्याची पद्धती मोडली. परंतु इंदुप्रकाश, ज्ञानप्रकाश, नेटिव ओपिनियन ही वृत्तपत्रे आपला प्रपंच वरीलप्रमाणे चालवित होती. टिळक - आगरकरांचे 'मराठा' पत्र यशस्वी झाले नसल्याची बाब लक्षात घेतल्यास सदर तोडीची संयुक्तता पटते.

पहा - न. र. फाटक प्रस्तावना - नियतकालिकांचा इतिहास, पृ. ०२

३८. पूर्वोक्त, कानडे, नियतकालिकांचा इतिहास, पृ. ०२

३९. पूर्वोक्त, जोशी, वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. १२ (अधिक माहितीसाठी पहा-केळकर, वृत्तपत्र मीमांसा, पृ. ४८.)

४०. उ. नि., न. र. फाटक, प्रस्तावना, नियतकालिकांचा इतिहास, पृ. १

४१. पूर्वोक्त, वि. कृ. जोशी, पृ. ३०२

४२. कित्ता, पृ. २९७

४३. उद्‌धृत, वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. ३००

४४. उ.नि., न. र. फाटक, प्रस्तावना, वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. १८

४५. पूर्वोक्त, जोशी वि.कृ., पृ. ३१५

४६. पूर्वोक्त, लेले रा.के., पृ. ८८

४७. कित्ता, लेले, पृ. ९१

४८. कित्ता, लेले, पृ. ११५

४९. कित्ता, लेले, पृ. १२४

५०. हिवाळे भा.पं., ज्ञानोदयाची पहिली शंभर वर्षे, पृ. ५३

५१. कित्ता, पृ. ५३

५२. पूर्वोक्त, पहा, लेले, मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. १४२

५३. उ.नि. वि.कृ. जोशी, पृ. ३६५, ६६

५४. फाटक न. र., प्रस्तावना, वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. १९

५५. पूर्वोक्त, लेले, मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. १५९

५६. उ.नि.वि.कृ.जोशी, मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. १४६

५७. पूर्वोक्त, लेले, मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. १७०-७१

५८. डॉ. व्यास प्रकाशचंद्र, महाराष्ट्रातील सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधन, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००४, पृ. ११.

५९. पूर्वोक्त, लेले, मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. १७२, ७३

६०. कित्ता, लेले, पृ. १८१

६१. घाटे वि. द., दिवस असे होते, मुंबई, १९६१, पृ. १२३, २४

६२. पूर्वोक्त, लेले, मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. २३४

६३. पूर्वोक्त, कानडे, नियतकालिकांचा इतिहास, पृ. १०१

६४. दिवाकर वैशाली, चव्हाण प्रवीण भारतातील राष्ट्रवाद : सिद्धांत आणि व्यवहार, पुणे, डिसेंबर २०००, पृ. १८.

६५. कित्ता, पृ. १५

६६. फडके य.दि., आगरकरांचा केसरी, शोध : बाळ-गोपाळांचा, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९७७, पृ. ४०.

६७. पूर्वोक्त, जोशी, वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. ३४८

६८. प्रा. भा.ल.भोळे यांनी यासाठी ‘अतीत गौरव’ ही संज्ञा वापरली आहे, (पत्रकार - भा.ल. भोळे) समाविष्ट - संपादक हरी नरके, महात्मा फुले : शोधाच्या नव्या वाटा, म. फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई ३२, १९९८, पृ. १३१

६९. उ. नि. लेले, मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. २७५

७०. पूर्वोक्त, दीक्षित राजा, इतिहास, समाजविचार आणि केशवसुत, पृ. ३५

७१. उ.नि., लेले, मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. २७१

७२. कित्ता, लेले, पृ. २७६

७३. कित्ता, लेले, पृ. २८२, ८३, ८४

७४. पूर्वोक्त, फडके, शोध : बाळ - गोपाळांचा, पृ. ३१

७५. फाटक न.र., प्रस्तावना, नियतकालिकांचा इतिहास, पृ. ३

७६. आगरकरांचा केसरी, 'केसरी' विरुद्ध 'सुधारक' या दोन लेखांमधून य.दि.फडके यांनी यासंदर्भात सविस्तर चर्चा केली आहे. (पहा - शोध : बाळ-गोपाळांचा - य.दि. फडके)

७७. पूर्वोक्त, फडके य.दि., पृ. ५३

७८. पुर्वोक्त, फडके, पृ. ३३४

७९. प्रधान ग.प्रा., आगरकर लेखसंग्रह, आवृत्ती-७, साहितय अकादमी, नवी दिल्ली, २००४, पृ. १५२.

८०. पुर्वोक्त, लेले, पृ. ३१९

८१. प्रेतयात्रा सुधारक आगरकरांची निघाली असा आजवर अभ्यासकांचा दावा होता ; मात्र आगरकरांसह सर्व सुधारकांची ही प्रेतयात्रा होती, असे सप्रमाण य.दि.फडके यांनी सिद्ध केले आहे. (शोध : बाळ-गोपाळांचा-फडके य.दि. )

८२. पूर्वोक्त, प्रधान ग.प्र., आगरकर लेखसंग्रह, पृ. १३१, ३२

८३. कित्ता, पृ. १७

८४. पूर्वोक्त, फडके य.दि., शोध : बाळ-गोपाळांचा, पृ. ६४

८५. उ.नि., केळकर, वृत्तपत्र मीमांसा, पृ. १०२

८६. कित्ता, केळकर, वृत्तपत्र मीमांसा, पृ. १२५

८७. पुर्वोक्त, लेले, मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. ३९२

८८. आगरकरांबरोबर झालेल्या संघर्षात कोल्हापूरच्या वेदोक्त प्रकरणात टिळकांची ही वृत्ती दिसून आली. 'केसरी' ची सर्व सुत्रे हाती आल्यावर साहजिकच त्या भूमिकेला प्राधान्य मिळाले.

८९. उपरोक्त, लेले रा. के., पृ. ३८०

९०. पुर्वोक्त, लेले, पृ. ३८२,८३

९१. फाटक न.र., प्रस्तावना, नियतकालिकांचा इतिहास, पृ. ३

९२. कित्ता, पृ. ६

९३. उ.नि.वि.कृ. जोशी, वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. ३३४

९४. कित्ता, पृ. ९३

९५. उ.नि., रा.के.लेले, पृ. २४९, २५०, २५१, २६८

९६. पूर्वोक्त, कानडे रा.गो., पृ. ८८

९७. श्री. शं. नवरे, मराठी वृत्तपत्रे (समाविष्ट) बेडेकर व भणगे (संपादक), भारतीय प्रबोधन, समीक्षण व चिकित्सा, समाज प्रबोधन संस्था, पुणे १९७३, पृ. ३६०.

९८. सुखराम हिवराळे, लोकपत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कोल्हापूर, १९९०, द्वितीयावृत्ती, पृ. ६

९९. उपरोक्त, लेले, पृ. ५२२

१००. कित्ता, पृ. ५२७

१०१. कित्ता, पृ. ५३३

१०२. कित्ता, लेले, पृ. ५३६

१०३. कित्ता, लेले, पृ. ५३७

१०४. कित्ता, लेले, पृ. ५३८, ३९

१०५. कित्ता, लेले, पृ. ५४६

१०६. उपरोक्त, फडके य. दि., १९८४, पृ. १८७, ८८

१०७. संपा. अ.ह.गद्रे, अच्युतराव कोल्हटकर, स्मारक ग्रंथ, भाग-२ रा, मुंबई १९३४, पृ. १५६-५७

१०८. उपरोक्त, लेले, पृ. ५७६, ७७

१०९. कित्ता, पृ. ५४८

११०. कित्ता, पृ. ५४८

१११. कित्ता, पृ. ५४९, ५०

११२. कित्ता, पृ. २४०, ४१

११३. कंसातील शब्द स्पष्ट स्पष्टीकरणासाठी अभ्यासकाने दिलेला आहे.

११४. उपरोक्त, प्रधान ग.प्र. पृ. १६

११५. उपरोक्त, फाटक न. र., प्रस्तावना, वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. २१

११६. उपरोक्त, जोशी वि. कृ., पृ. ४७७

११७. कुलकर्णी भीमराव, साहित्य चर्चा आणि साहित्य समिक्षा, केसरी १८८१, समाविष्ट संपाद. गोखले शरच्चंद्र १९८१, केसरी शताब्दी ग्रंथ

११८. उपरोक्त, लेले रा. के., पृ. २३७

११९. कित्ता, पृ. ४८९

१२०. कित्ता, पृ. २५३

१२१. उपरोक्त,कानडे रा.गो, पृ. ८५

१२२. कित्ता, पृ. ८५

१२३. उपरोक्त, जोशी वि. कृ., वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. ४७६

१२४. भा. ल. भोळे, पत्रकार, समाविष्ट हरी नरके (संपा.), महात्मा फुले : शोधाच्या नव्या वाटा, पृ. १२५

१२५. भा.ल.भोळे, मराठी गद्यशैलीला जोतीरावांचे योगदान, समाविष्ट, नरके/फडके, महात्मा फुले गौरव ग्रंथ, खंड पहिला, सुधारित द्वितीयावृत्ती, १९९१. पृ. ६८४ (प्रकाशन - म. फुले चरित्र साधने समिती, मुंबई -३२.)

१२६. धनंजय किर, लोकमान्य आणि राजर्षी शाहू - एक मूल्यमापन, पृ. ३९, ५९ 'या पुस्तकाचा उल्लेख पुढे टिळक आणि शाहू असा केला आहे.'

१२७. पुर्वोक्त, भा. ल. भोळे, पत्रकार, समाविष्ट हरी नरके (संपा.), महात्मा फुले : शोधाच्या नव्या वाटा, पृ. १२६

१२८. उपरोक्त, फडके य. दि., पृ. ७७-७८

१२९. रा.ना.चव्हाण, जुनी कागदपत्रे पुरोगामी सत्यशोधक, वर्ष १७, अंक २, एप्रिल-मे-जून १९९२

१३०. उपरोक्त, फडके य. दि., पृ. ७८

१३१. कित्ता, पृ. ५३

१३२. उपरोक्त, किर धनंजय, पृ. ३४, ३५

१३३. कित्ता, पृ. २९.

१३४. उपरोक्त, लेले रा.क., मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, पृ. ३५

१३५. कित्ता, पृ. ३५

१३६. कित्ता, पृ. ७१

१३७. उपरोक्त, किर धनंजय, पृ. ७१

१३८. कित्ता, पृ. ७१

१३९. उपरोक्त, लेले रा.क., पृ. ३५३

१४०. उपरोक्त, लेले रा.क., पृ. २७

१४१. कित्ता, पृ. २४३.

१४२. हरी नरके, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता, १९२०-१९२८, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १९, प्रस्तावना, पृ. २५.

१४३. उपरोक्त, लेले रा.क., पृ. ३५४.

१४४. कांबळे अरुण, जनता पत्रातील लेख डॉ. बाबसाहेब आंबेडकर, प्रस्तावना, पृ. ४